तूं दिवादांडी भवसागराची

१. मज निरंतर जागविती

– श्रीमती परिमल भारतीय, पुणे

काय सांगू आता संतांचे उपकार । मज निरंतर जागविती ।। १ ।।
काय द्यावे त्यासी व्हावे उतराई । ठेविता हा पायी जीव थोडा ।। धृ ।।
सहज बोलणे हित उपदेश । करुनी सायास शिकविती ।। २ ।।
तुका म्हणे वत्स धेनु वेचे चित्ती । तैसे मज येती सांभाळीत ।। ३ ।।

स्वामीजींच्या विषयी विचार करताना हा अभंग सहजगत्या आठवतो. स्वामीजींचे वागणे, बोलणे, प्रत्येक कृती ही शिष्योद्धारासाठीच असते व कृती तथा उक्तीतून ते सर्व साधकांना जागे करण्याचा उपदेश करीत असतात. असाच एक प्रसंग सांगते, संगीता बेटी तुझी कधी दाढ दुखली आहे का? हो स्वामीजी अनेक वेळा. तेव्हा कसं वाटतं? अगदी नकोसं वाटतं स्वामीजी. खूप वेदना होतात. मग बेटी वारंवार होणाऱ्या ह्या वेदना कायमच्या संपवायच्या असतील तर आत्ता होणारा हा त्रास थोडा सहन कर.

स्वामीजींसारखे समर्थ सद्गुरू मिळाले आणि आश्रमाच्या साधिका संगीताताईंचा ज्ञानेश्वरीत सहाव्या अध्यायात सांगितलेला माँ जगदंबा कुंडलिनी शक्तीचा प्रवास सुरू झाला. साधनेच्या उच्च अवस्थेत असताना एकदा त्यांना खूप त्रास होत होता तेव्हा त्या स्वामीजींना विनंती करत होत्या. मला हा त्रास सहन होत नाही. स्वामीजी थांबवा हे सगळं. त्यावेळी स्वामीजींच्या त्यांच्या खास शैलीत ते त्यांना समजावून सांगत होते. अत्यंत अवघड गहन विषय व्यवहारातली उदाहरण देऊन अगदी सोपा करून सांगणाऱ्या स्वामीजींची हातोटी स्वामीजींसारखीच जगावेगळी आहे.

जन्ममरणाच्या चक्रातून सोडवणारी साधनेची गाथा (साधकाच्या देहातल्या भगवती कुंडलिनी शक्तीचा प्रवास) मेधा ऋषींनी हजारो वर्षापूर्वी दुर्गासप्तशती ह्या ग्रंथात कथेच्या रूपाने सांगितला आहे. काळाच्या ओघात त्याचे रहस्य, त्यातला गुह्य अर्थ लोप पावला आणि सप्तशती म्हणजे एक सकाम उपासनेचा ग्रंथ असा समज रुढ झाला. मुळात हा ग्रंथ संस्कृत. त्याचा वाच्यार्थसुद्धा समजायला कठीण, तर गुह्यार्थ कुठून कळावा?

भगवंतांनी मोह महिषासूराला मारणारे ज्ञान गीतेच्या रूपाने अर्जुनाला दिले. गीता संस्कृतमध्ये. पुढे लोकांना तिचा अर्थ कळेना तेव्हा भगवंतांना भवसागरात बुडणाऱ्या आपल्या लेकरांची दया आली आणि माऊलींच्या रूपाने ते स्वत: पुन्हा पृथ्वीवर आले आणि जगाला ज्ञानेश्वरी मिळाली. तद्वतच सातशे श्लोकांची ही गीताच कथेच्या रूपाने सातशेच श्लोकात सप्तशतीत कशी सांगितली आहे, माणसाच्या देहातच त्या महिषासूराचा वध कसा करता येतो? त्या प्रवासाचे वर्णन अत्यंत सोप्या शब्दांत मराठी भाषेत सांगण्यासाठी मेधा ऋषीच पुन्हा स्वामीजींच्या देहातून अवतरले, त्यामुळे '**महामाया प्रभावेण**', '**रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग**' आणि '**मी तू पणाची झाली बोळवण**' हे ग्रंथत्रय आम्हाला प्राप्त झाले असा माझा दृढ विश्वास आणि श्रध्दा

आहे.

'रात्रंदिन आम्हा युध्दाचा प्रसंग' ही तुकोबारायांच्या अभंगातली ओळ आपल्या सर्वांच्या परिचयाची आहे, पण हे युध्द नेमकं कोणामध्ये आणि कुठं चालतं? हे आपल्याला माहित नाही. हे युध्द समजावून सांगताना स्वामीजी सुरूवातीलाच मध्यम चरित्रातल्या पहिल्या ओळीचा अर्थ सांगतात तेव्हा पश्चातापाचे अश्रू आवरता येत नाहीत.

देवांमध्ये आणि महिषासूरामध्ये शंभर वर्षे पर्यंत युध्द चाललं हे सांगताना स्वामीजी वेळेचा हिशोब मांडून दाखवतात. समजा तुम्ही रोज एक तास साधना करत असाल तर महिन्याचे तीस तास म्हणजे सव्वा दिवस झाला मग आता मोजा शंभर वर्षे कशी पूर्ण करायची? तो हिशोब आणि आपलं वय पाहिलं की बापरे! किती उशीर झाला आहे? याचा विचार करुन छाती दडपते. कारण स्वामीजींनी काढलेल्या हिशोबाने आपल्याला २४०० वर्षाचे आयुष्य लागेल म्हणजे किती जन्म? इथे स्वामीजी आपल्याला सावध करतात आता तरी गाफील राहून बेजबाबदारपणे आपला वेळ वाया घालवू नका. तुमच्या हृदयात हा देवासूर संग्राम अखंड चालू राहू द्या. माँ भगवतीला शरण जा तिच तुमच्या देहातले महिषासूर, मधुकैटभ चंडमुंड, शुंभनिशुंभ, रक्तबीज आणि सगळे राक्षस मारून तुम्हाला बंधमुक्त करेल आणि आपल्या लाडक्या लेकराला मांडीवर घेईल.

पुढे मराठीतल्या 'तीन तेरा आणि नऊ अठरा' ह्या म्हणीचा आध्यात्मिक अर्थ सांगताना स्वामीजी सांगतात दुर्गा सप्तशतीतली तीन चरित्र आणि तेरा अध्याय आणि गीतेतले नऊ विषय आणि अठरा अध्याय ज्याच्या हृदयात उतरले त्याचा बेडा पार झाला.

स्वामीजींच्या कल्पकतेतून साकार झालेल्या ह्या तीनही ग्रंथांच्या मुखपृष्ठापासूनच आपल्याला खूप कांही शिकवण मिळत जाते. प्रथम चरित्रावरच्या महामाया प्रभावेण ग्रंथाच्या मुखपृष्ठावर पाच पांढरे घोडे काढून त्यावर ज्ञानेंद्रियांच्या पाच तन्मात्रांची नावे लिहून सारथी आणि रथीच्या जागी प्रश्नचिन्ह केले आहे. मला वाटते स्वामीजींना त्यातून आपल्याला असे सांगायचे असेल की, मृत्युच्या दिशेने वेगाने धावणारा मनुष्य देहाचा हा रथ साधकाला म्हणजे रथीला 'यदगत्वा न निवर्तन्ते' ह्या त्याच्या धामाला तेव्हाच घेऊन जाईल तेव्हा ज्ञानेंद्रियांचे हे घोडे सत्वगुणी असतील आणि बुद्धीरूपी सारथी शुद्ध आणि निर्मळ असेल.

स्वामीजी नेहमीच सांगत असतात ईश्वर प्राप्तीच्या मार्गात एकमेव अडथळा कोणता असेल तर तो माणसाच्या बुद्धीचा. तुमचे संकल्प-विकल्प, शंका-कुशंका तुम्हाला सापशिडीतील सापाच्या तोंडात नेवून टाकतात आणि साधनेत तुमची एकदम घसरण होते.

मध्यम चरित्राच्या रात्रंदिन.... ग्रंथाच्या मुखपृष्ठावर युद्धाच्या पावित्र्यात असलेला रेडा म्हणजे महिष आणि सिंहाचे चित्र आहे. चित्रात युध्दाच्या पावित्र्यात असलेला रेडा पायाने माती उकरतो आहे. ग्रंथात त्याचा गहन अर्थ सांगितला आहे. महिषासूर म्हणजे आपलं संचित प्रारब्ध जे आपल्याला जन्म मरणाच्या चक्रात पुन्हा पुन्हा फिरवतं. माँ भगवती आणि गुरूमहाराजांच्या कृपेने त्याचा नाश होणार आहे, पण ते सहजासहजी संपत नाही. माती उकरणे म्हणजे आपल्या अंर्तमनात खोलवर पडून राहिलेल्या आपल्या वासना तो उकरून काढतो

आणि त्यातून साधकाची कशी अधोगती होते हे अनेक सत्यघटनांच्या आधारे स्वामीजी मोठ्या कळकळीने समजावून सांगतात. त्या घटना वाचल्या की खरोखरच आपण अगदी दिङ्मूढ होऊन जातो आणि त्या विचारांनी रात्र रात्र झोप येत नाही.

या युद्धात महिषासूराबरोबर लढणारा सिंह म्हणजे अत्यंत उच्च कोटीची साधना असलेला साधक आहे. त्याने माँ ला धारण केले आहे म्हणजे गुरू माँ त्याचं सर्वस्व आहेत. इथे स्वामीजी आपल्याला सांगतात हे युद्ध सुरूवातीला तुम्हालाच करायचे आहे. संचित प्रारब्ध म्हणजे थेंबाथेंबाने गोळा केलेला मध म्हणजे तुमच्या जन्मोजन्मीच्या अतृप्त इच्छा. तो मध माँ भगवती तेव्हाच प्राशन करेल जेव्हा तुम्ही तिचे सिंह व्हाल. माँ चा सिंह होण्यासाठी स्वामीजी वारंवार संपूर्ण शरणागतीचा उपाय सांगतात.

तिसरा ग्रंथ उत्तर चरित्रावरचा. मी तू पणाची झाली बोळवण आपल्या सगळ्यांनाच दत्तात्रेयांच्या आरतीतली ही ओळ पाठ आहे पण मी तू पणाची बोळवण होते म्हणजे नेमकं काय? एकनाथ महाराजांना साधनेतला कोणता अनुभव आला होता. मी संपला आणि तू ही संपला म्हणजे काय? तो कसा संपतो? साधनेतलं हे सगळ गूढ रहस्य स्वामीजी ह्या ग्रंथात अगदी सहज उलगडून सांगतात. मुखपृष्ठावरच्या दोन पणत्या आणि एक ज्योत आणि मलपृष्ठावरचे राधेचं कृष्ण स्वरूपातलं प्रतिबिंब साधकाच्या जीवनातलं साधनेचं अंतिम साध्य काय आहे हे सहजच उलगडून दाखवतात.

सर्वच ग्रंथांचे शीर्षक आणि मुखपृष्ठ यातून स्वामीजींच्या व्यक्तीमत्वातला हाडाचा शिक्षक आपल्याला भेटतो. त्यातून त्यांची विद्वता, कल्पकता आणि साधनेतल्या सखोल, बारीक-सारीक विचार मंथनाच्या दिव्यत्वाची प्रचिती येते आणि आपसुकच आपले हात वारंवार जोडले जातात.

या तिन्ही ग्रंथांमध्ये मनुष्य जन्माच्या कल्याणाचे रहस्य अत्यंत सोप्या भाषेत स्वानुभवातून सांगताना एकेका शब्दाकडे स्वामीजी आपले लक्ष वेधतात.

आपल्या सर्वांना गुरूचरित्रातली धोब्याची गोष्ट माहित आहे. श्रीपादश्रीवल्लभांसारख्या दत्त अवतारी समर्थ सद्गुरूंची भेट होऊनही धोब्याच्या मनात 'राजा' होण्याचे बीज पडलं आणि पुढे कित्येक जन्म घेत तो पुन्हा नृसिंह सरस्वतींच्या अवतारात व्याधीग्रस्त यवन बादशहाच्या जन्मात स्वामींना भेटला. परंतु तो मुक्त झाला की अजूनही फिरतोय हे मात्र माहित नाही. प्रथम चरित्रात सुरवातीलाच ही गोष्ट सांगून स्वामीजी आपल्याला अंतर्मुख करतात. एका इच्छेने त्या जीवाला किती फिरवत ठेवले मग आपल तर काय? आपल्याला अजून काय काय हवं आहे मग आपल्यासाठी किती हजारो जन्म आणि वर्षे?

याच ग्रंथात पुढे स्वामीजी एक महत्वाचा सावधानतेचा इशारा देतात. आपल्या सद्गुरूंच्या किंवा इष्ट देवतेच्या चरणी समर्पीत व्हा. आपली मन आणि बुद्धी हेच सुरथ राजाचे अमात्य आहेत त्यांच्या आधीन होऊन आपली साधना सांसारिक कामांसाठी खर्च न करता शिल्लक ठेवून वाढवत रहा नाहीतर धोका होईल. कारण सद्गुरूंची कृपा झाल्यावर तुम्ही मनु झाला असलात तरी अजुन पूर्णत्वापर्यंतचा प्रवास बाकी आहे. सावधान! आपल्या आयुष्यात ज्या काही घटना घडतील त्या भगवतीचा प्रसाद म्हणून स्वीकारा, विचलित न होता

आपल्याला प्राप्त झालेल्या चैतन्यमयी गुरूमंत्राचा उठता बसता नेटाने जप करत रहा, त्याचा ध्यास घ्या.

महिषासुराच्या कथेत माँ ने नि:श्वास सोडले त्यातून देवीचे गण निर्माण झाले त्याचे रहस्य उलगडताना स्वामीजी सांगतात माँ चे नि:श्वास म्हणजे तुम्हाला मिळालेला चैतन्य मंत्राचा जप. माँ च्या आयुधांचे वर्णन करताना स्वामीजी पुन्हा पुन्हा आपल्या मनावर ठसवतात हे आतलं युध्द आहे तिथे शस्त्रास्त्र म्हणजे धातुच्या ढाल तलवारी नाहीत तर तो आहे गुरूमहाराजांनी साधकाला दिलेल्या चैतन्य मंत्रांचा जप, साधकाचे काम एकच संपूर्ण समर्पणाने त्या मंत्राचा जप करणे. सहाव्या अध्यायात धूम्रलोचनाचा वध माँ कोणत्याही शस्त्राशिवाय फक्त हुंकाराने करते. हुंकार म्हणजे साधकाने केलेला सोऽहं मंत्राचा जप. धूम्रलोचन म्हणजे भ्रम, विपरीत ज्ञान. सोऽहं म्हणजे 'स्व' स्वरूपाचे ज्ञान. साधकाला स्वरूपाचे ज्ञान झाले की भ्रमाचा आपोआपच नाश होतो आणि साधकात लपून बसलेला धूम्रलोचन मरतो.

त्याच अध्यायात धूम्रलोचन अहंकाराने अंबिकेला म्हणतो मी तुझे केस धरून ओढून नेईन. आपल्या ह्या पंचमहाभूतांच्या स्थूल शरीरात सर्वात जड व निर्जीव भाग म्हणजे केस. तो केसाच्या म्हणजे जड वस्तूच्या सहाय्याने भगवतीला म्हणजे चैतन्याला प्राप्त करू इच्छीतो. धूम्रलोचन म्हणजे विपरीत ज्ञान किंवा भ्रम. जोपर्यंत ईश्वर साधनसाध्य नसून कृपासाध्य आहे हे समजत नाही तो पर्यंत हे भ्रम साधकाला त्रस्त करत राहतात.

स्वामीजी नेहमी सांगतात ज्याला ईश्वरप्राप्तीची खरी तळमळ लागली आहे. त्या साधकाने रामचरितमानस मधील परिक्षा घ्यायला आलेल्या सप्तर्षींना पार्वतमातेने दिलेलं उत्तर अखंड लक्षात ठेवून प्रत्यक्षात अंमलात आणावं.

''वरऊँ संभु न न रहऊँ कुआरी।'' साधकाचा हा दृढनिश्चय झाला तरच शिवशक्तीचं मिलन शक्य आहे अन्यथा चालूच आहे पुनरपि जननं.....

कर्माशयाचा वृक्ष, आगम, संचित आणि भविष्यवत् प्रारब्ध. त्यातून निर्माण झालेल्या ब्रह्मग्रंथी, विष्णुग्रंथी, रूद्रग्रंथी. वेगवेगळ्या टप्प्यावर भेटणारे या युध्दातले राक्षस म्हणजे साधकांच्या साधन मार्गातले अडथळे. याचं सविस्तर वर्णन वाचलं की याची खात्री पटते आपले स्वामीजी ब्रह्मनिष्ठ आणि भगवतस्वरूप आहेत. तसेच हे सर्व त्यांच्या स्वानुभवाचे बोल आहेत याची पुन्हा एकदा प्रचिती येतेच आणि असे सद्‌गुरू आपल्याला लाभले याचा सात्विक अभिमान वाटल्याशिवाय रहात नाही. स्वामीजी सागर आहेत. आपण एक छोटासा थेंबुटा, थेंबुट्याने फक्त स्वत:ला सागरात झोकून द्यायचं की झालं काम!

हे तिन्ही ग्रंथ वाचताना साधनेतल्या सगळ्या प्रश्नांची उत्तरं अगदी सविस्तर मिळत जातात. आश्रमाचे साधक श्री. महेश वसगडेकर याचा आपला परिचय असेलच. त्यांना अनेकवेळा नर्मदा परिक्रमा केली आहे अशा एक साधिका भेटल्या होत्या. त्यांच्या तीन चार परिक्रमा जगन्नाथ कुंटेबरोबरही झाल्या आहेत. त्या महेशला सांगत होत्या जगन्नाथ कुंटे त्यांना अनेक वेळा सांगायचे तुम्हाला साधनेतल्या कोणत्याही प्रश्नांची स्वानुभवाची उत्तरं पाहिजे असतील तर तुम्ही स्वामी सवितानंदांचे ग्रंथ वाचा. महाराष्ट्रातले ख्यातनाम प्रवचनकार आणि महाभारताचे गाढे अभ्यासक श्री. दाजी पणशीकर त्यांच्या प्रवचनात अनेकवेळा लोकांना सांगत असतात

तुम्हाला साधनेच्या संदर्भात काहीही शंका असतील तर स्वामी सवितानंदांची पुस्तकं वाचा. इतर ठिकाणी कुठेही गेलात तर फक्त फसगत होईल. कुठेही भटकू नका. फक्त स्वामीजींच्या मार्गदर्शनाप्रमाणे चाला.

तसेच सध्या रामजन्मभूमी न्यास, अयोध्याचे खजिनदार श्री. गोविंददेव गिरीजी जे स्वत: खूप विद्वान आहेत आणि सद्‌गुरूपदाधिष्ठितही आहेत. ते सुद्धा त्यांच्या साधकांना साधनमार्गाच्या यशस्वी वाटचालीसाठी स्वामीजींच्या ग्रंथांचा अभ्यास करायला सांगतात. इतकच काय करवीर पीठाचे शंकराचार्यही त्यांच्या प्रवचनात लोकांना स्वामीजींच्या ग्रंथांची शरण घ्यायला सांगतात.

हे सर्व मी का लिहित आहे, बरेच वेळा ‘पिकतं तिथं विकत नाही’ अशी आपली अवस्था होते. स्वामीजी आपल्यात मिसळून राहतात त्यामुळे आपल्याला ते आपल्यासारखेच वाटायला लागतात आणि माझ्या आत्मनिवेदन लेखात लिहीलेल्या चुका कळत नकळत आपल्या हातून घडून जातात; ज्या आपल्याच प्रगतीला मारक ठरतात. असो -

सप्तशतीमध्ये मधुकैटभ वध म्हणजे आगम प्रारब्धासाठी एकच अध्याय आहे. संचित प्रारब्ध म्हणजे महिषासूर आणि त्याच्या सेनेसाठी दोन अध्याय आहेत परंतु शुंभ नि:शुंभ म्हणजे जीवाचं मी-माझं पण यासाठी सहा अध्याय येतात याचं रहस्य उलगडून सांगताना स्वामीजी लिहीतात - मधुकैटभ म्हणजे तुमच्या शुभ अशुभ कर्मांची फळं. निश्चयपुर्वक त्यांचा त्याग केला तर मधुकैटभ मरून साधकाची ब्रह्मग्रंथी तुटते, महिषासूराचं युध्द स्थूल पातळीवर आहे. संपूर्ण सृष्टीमधल्या चैतन्याचा अनुभव करून आणि संपूर्ण शरणागती पत्करून माँ चा सिंह होऊन साधकाची विष्णू ग्रंथी तुटते आणि महिषासूरही मरतो. पण शुंभ नि:शुंभ हे तर अत्यंत सूक्ष्म स्तरावरचे राक्षस. त्यांच्या युध्दातली त्याची राक्षस सेना म्हणजे ईश्वरप्राप्तीच्या अभिलाषेचे शुभ संस्कार. मोक्षप्राप्ती-ईश्वरप्राप्ती ही अतिशय कल्याणकारी असली तरी वासनाच. ती ही संपते तेव्हाच निर्बिज समाधी अवस्था प्राप्त होऊन जीवाचे शिवाशी खऱ्या अर्थी मिलन होते. परंतु जीवाची ही अस्मिता सहजासहजी मिटत नाही. अगदी शेवटी तू देव मी भक्त हे द्वैत ठेवण्यासाठी तो धडपडतो. हे शेवटचे द्वैतही मिटण्यासाठी गुरूमहाराजांची कृपा त्यासाठी संपूर्ण शरणागती हा आणि हाच एकमेव उपाय आहे. माऊलींनी ज्ञानेश्वरीत सांगितलचं आहे हे अतिशय कठीण काम करण्यासाठी ***गुरूकृपाही केवलम्।***

काय काय आणि किती किती लिहू? तिन्ही ग्रंथातला एकेक शब्द महत्वाचा आहे. प्रत्येकाने सखोल अभ्यास करून स्वत: समजून घेण्याचा तो विषय आहे. हे तिन्ही ग्रंथ ईश्वरप्राप्तीची खरी तळमळ लागलेल्या कोणत्याही धर्माच्या, पंथाच्या, संप्रदायाच्या साधकासाठी दीपस्तंभाचे काम करतील. स्वामीजींनी अगदी सुरवातीपासून म्हणजे मूलाधार चक्रापासून सहस्त्रारापर्यंतचा सर्व प्रवास हळूवारपणे कमळाची एकेक पाकळी उमलावी तसा अलगद उलगडून दाखवला आहे. जगातल्या सर्वात अमूल्य खजिन्याच्या चाव्याच जणू त्यांनी आपल्या हातात दिल्या आहेत.

त्या ग्रंथामध्ये स्वामीजींनी अनेक गूढ अर्थ सोपे करून सांगितले आहेत त्याची महत्वाची काही उदाहरणे पाहून हे लिखाण आवरतं घेते.

प्रथम चरित्रात 'महामाया' याचा व्यवहारातला रूढ अर्थ चुकीचा असून आनंदस्वरूप परब्रह्म परमात्म्याचेच ते साकार रूप आहे हे सांगून साधकाच्या देहातल्या शेष आणि शेषाच्या डोक्यावर पृथ्वी म्हणजे काय हे स्वामीजी समजावून सांगतात. माणसाच्या देहाचा आधार असलेली भगवती कुंडलिनी शक्तीच्या वर पृथ्वीतत्वाचे मूलाधार चक्र वसलेले आहे. विष्णू म्हणजे शरीरातला प्राण आणि लक्ष्मी म्हणजे प्राणशक्ती म्हणूनच फक्त जिवंत माणसाच्या नावामागे श्री. लिहीतात; असे अनेक बारकावे स्वामीजी जाता जाता सहज सांगून जातात.

मध्यम चरित्रात सुरवातीलाच स्वामीजी 'राक्षस' ह्या शब्दाबद्दल एक संपूर्ण परिच्छेद लिहीतात. लहानपणापासून आपल्या मनात राक्षस म्हणजे अक्राळविक्राळ शरीराचा कोणी भितीदायक प्राणी अशी धारणा झालेली आहे. पण स्वामीजी राक्षसाबद्दल जे लिहीतात ते वाचलं की, आपल्या लक्षात येतं अरे हे राक्षस तर माझ्याही व्यक्तिमत्वात आहेत. उदा. महिषासूराच्या सेनेतले - परिवारीत राक्षस म्हणजे परिवारासाठी पापपुण्याची तमा न बाळगता वाट्टेल ते काम करणारा, असिलोमा म्हणजे इर्ष्या करणारा, बाश्कल म्हणजे वायफळ बडबड करणारा, चिक्षुर म्हणजे संकल्प-विकल्प करणारी आपली बुद्धी तर बिडालाक्ष म्हणजे प्रत्येक वस्तूकडे भोगदृष्टीने पाहणारा हे आणि असे कितीतरी दुर्गुणरूपी राक्षस राजरोसपणे आनंदाने आपल्या आत रहात आहेत हे जाणवून आपण अंतर्मुख होतो आणि आपल्या लक्षात येतं राक्षस म्हणजे आकृती नाही तर माणसाच्या मनाच्या विकृती. ज्यापुढे जाऊन साधकाच्या साधनेच्या प्रवासातले अडथळे ठरतात.

पुढे देवांच्या तेजापासून महालक्ष्मी प्रगट झाली म्हणजे काय हे सांगताना स्वामीजी लिहीतात - देवांना जेव्हा समजतं आपलं तेज आणि आपली आयुधरूपी शक्ती मूळात माँ चीच आहे तेव्हा ते तिचचं तेज आणि आयुधं तिला समर्पित करतात म्हणजेच साधक जेव्हा आपलं सर्वस्व आपल्या गुरू माँ च्या चरणी अर्पण करतो तेव्हा त्याच्या युध्दाची सूत्र माँ हाती घेते.

महिषासुराच्या आक्रमणाबद्दल स्वामीजी खूपच सविस्तर लिहीतात त्याचा थोडक्यात आशय असा - आपली ज्ञानेंद्रिये आणि कर्मेंद्रिये जेव्हा विषयभोगात रमून जातात तेव्हा जीवाची अधोगती होते. सर्वसामान्य माणसांना तर हेच जीवन आहे असं वाटतं. त्यांना ते महिषासूराचे आक्रमण वाटतच नाही. त्यामुळेच जीवन मरणाचं हे चक्र अखंड फिरत रहातं. मात्र ईश्वर प्राप्तीची तळमळ लागलेला खरा साधक जेव्हा स्वामीजींनी लिहीलेले महिषासूराचे हे वर्णन वाचतो तेव्हा तो अत्यंत उद्विग्न होऊन आर्त स्वरात माँ ला हाक मारल्याशिवाय राहूच शकत नाही.

उत्तर चरित्रात पाचव्या अध्यायातल्या पहिल्याच श्लोकात ऋषींनी इंद्राला 'शचीपती' हा शब्द वापरला आहे. इंद्राची अनेक नावं असताना हेच नाव का वापरलं ह्याचं विश्लेषण करताना स्वामीजी सांगतात शचीपती म्हणजे वासना, विकार, मौज, शौक, विलास, विषयभोगात गुरफटलेला साधक. खरं तर यापूर्वी महिषासूराला मारून माँ ने त्याला त्याचे राज्य इंद्र देवांसह पुन्हा मिळवून दिले होते. पण दु:ख दूर झाले विषयसुख मिळाले आणि तो माँ भगवतीला विसरला. इथे स्वामीजी जीवाची विषयभोगी प्रवृत्ती आपल्या लक्षात आणून देऊन

आपल्याला सावध करतात.

त्यानंतर आठव्या अध्यायातल्या रक्तबीजाबद्दल स्वामीजी लिहीतात रक्तबीज म्हणजे कामवासना. ही एकच वासना अशी आहे जी जशीच्या तशी पुन्हा पुन्हा उभारते. अर्थातच सृष्टी उत्पत्तीसाठी विधात्याचीच तशी रचना असेल.

या रक्तबीजाला मारण्यासाठी सर्व देवांच्या शक्ती म्हणजे सप्त मातृका प्रयत्न करतात पण तो मरत नाही. याचे स्पष्टीकरण करताना स्वामीजी सांगतात ऐंद्रीचा इंद्रिय निग्रह, वैष्णवीचा कामभोगावरचा संयम, कौमारीचं ब्रह्मचर्य, वाराहीचे यज्ञयाग, ब्राह्मीचे मंत्रप्रयोग आणि माहेश्वरीची कामदहनाचीं शक्ती म्हणजे तीव्र वैराग्य ह्या कशानेच रक्तबीज मरत नाही, कारण आपल्या प्रत्येकाच्याच देहात आपल्याला शक्ती प्रदान करणारे चंद्रामृत थेंबाथेंबाने पाझरत असते. सामान्य माणसाच्या बाबतीत तो जीवनरस सरळ खाली मूलाधारात जाऊन पडतो. मूलाधाराच्या वरच स्वाधिष्ठान चक्र आहे. तिथेच हा रक्तबीज पुन्हा पुन्हा निर्माण होतो. सद्गुरूकृपेने साधकाच्या देहात जगदंबा कुंडलिनी जेव्हा जागृत होऊन उर्ध्वमुखी होते तेव्हा ते अमृत त्याच्या घशात उतरते म्हणजेच अंबिकेच्या शस्त्राने मेलेल्या रक्तबीजाचे रक्त चंडी प्राशन करते. त्यामुळे ते मूलाधारापर्यंत पोहचत नाही आणि नवीन रक्तबीज निर्माणच होत नाही. आधीच्या रक्तबीजांना भगवती पाच प्रकारच्या शस्त्रांनी मारते ती पाच आयुध म्हणजे विश्वास, अनुभव, युक्ती, शास्त्र आणि कृपा. म्हणजे सद्गुरूवर विश्वास ठेवून त्यांनी सांगितलेली साधना सुरू करायची. त्यातून अनुभवक्षेत्र संपन्न होईल. त्या अनुभवांचा युक्तीपूर्वक विचार करून त्यांना शास्त्राचा आधार घेऊन सर्वतोभावे गुरू माँ ची शरणागती स्वीकारून त्यांची कृपा संपादन करायची. म्हणजे सहजच रक्तबीजाचा वध होतो, असा साधा आणि सोपा मार्ग स्वामीजी इथे दाखवतात.

तेराव्या अध्यायात वाळवंटात माँ ची मृण्मयी मूर्ती स्थापन करून राजाने आणि वैश्याने माँ ची उपासना सुरू केली. त्यावेळी त्या दोघांनी शरीरातल्या रक्ताने बळी प्रोक्षित (भिजवून) करून माँ ला अर्पण केले. अशी सतत तीन वर्ष त्यांनी आराधना केली तेव्हा माँ ने प्रगट होून त्यांना इच्छित वर दिला असे लिहिले आहे. रक्त प्रोक्षित आहुतीमधले रहस्य समजावून सांगताना स्वामीजी लिहीतात – एखाद्या माणसाच्या शरीरात रक्त कमी असेल तर त्याला शक्तीहीन वाटते अर्थात माणसाची शक्ती त्याचे बळ, त्याची कर्तृत्वशक्ती, प्रतिकारक्षमता, स्वभाव, जातकुळीचा अभिमान यांचा संबंध रक्ताशी आहे.

राजाने आणि वैश्याने आपली कर्तृत्वशक्ती म्हणजे कर्तेपणाचा अहंकार, शारिरीक बळ, जातकुळीचा अभिमान, आपल्या स्वभावातले गुणदोष सर्व काही माँ च्या चरणी अर्पण केलं. अनन्यभावाने ह्या सर्वांच्या आहुती देऊन त्यांनी त्यांचे संपूर्ण समर्पण केले तेव्हा भगवती स्वत: त्यांच्यापुढे प्रगट झाली आणि तिने त्यांना इच्छित वर दिले.

किती छान अर्थ सांगतात ना स्वामीजी! किती सखोल विचार केला असेल त्यांनी. नागपूरच्या पवनीकरताई म्हणतात पूर्वी जे ऋषी होऊन गेले ते दृष्टा होते म्हणजे विश्वकल्याणासाठी परमेश्वराकडून आलेले अनेक मंत्र त्यांनी दिसायचे तेच त्यांनी लिहून काढले त्यातूनच आपले वेद उपनिषदं तयार झाली. त्या ऋषींना

आपण तर काही पाहिलं नाही पण स्वामीजींकडे पाहिलं की वाटतं ते ऋषी ही असेच असले पाहिजेत.

अगदी खरं आहे ताईंचं म्हणणं आपले स्वामीजी तसेच द्रष्टा आहेत, निर्मोही आहेत, भारतमातेचे सुपुत्र आहेत. त्याच ग्रंथात एका ठिकाणी ते लिहीतात काश्मीरच्या माँ शारदेचं पीठ असलेल्या श्रीनगरचं वैभव पुन्हा प्राप्त होईपर्यंत मी पुन्हा पुन्हा जन्म घेईन. साक्षात माँ भगवतीची व श्री शक्तीबालक बाबा यांचा आशीर्वाद प्राप्त असलेल्या, जन्म-मृत्युच्या पलीकडे 'अवधूत' अवस्थेपर्यंत पोहोचलेल्या एका श्रेष्ठ पुरुषाची पुन्हा एकदा या जीवनमरणाच्या चक्रात उतरण्याची तयारी म्हणजे या संस्कृती आणि देशाच्या वैभवाकरीता सर्वसंगपरीत्याग करुन मिळललेल सगळ काही सोडून देणे म्हणजे केवढा हा त्याग, केवढी ही निष्ठा!

या ग्रंथांमध्ये अनेक ठिकाणी स्वामीजी सावधानतेचा लाल कंदिल दाखवतात. रात्रंदिन ... मध्ये तर स्वामीजींनी 'सावधान' या शीर्षकाखाली संपूर्ण एक प्रकरण लिहीले आहे-भयंकर पतनाच्या दिशेने साधकाची वाटचाल होऊ नये म्हणून ते आपल्याला सावध करतात -

मधुकैटभ-चिक्षुर-चामर मेले, आत्मज्ञानाची स्थिती जवळ आली, साधकाच्या चेहऱ्यावर तेज आलं, वाणीत गोडवा आला, वागण्या-बोलण्यात आकर्षकता आली, आजूबाजूच्या लोकांना त्याच्या वागण्याबोलण्यात वेगळेपणा जाणवू लागला की त्या लोकांचे दोन गट तयार होतात. आधी मनोमन ईर्षा करणारे आता तुमचे उघड उघड निंदक होतात. तुमच्यावर टीका करण्याची, बोलण्याची एकही संधी ते सोडत नाहीत. खोटे आरोप करणं, चारित्र्यावर शिंतोडे उडवणं असे त्यांचे उद्योग सुरू होतात, त्यामुळे साधक घाबरला, गोंधळला तर त्याची साधना संपलीच. परंतु स्वामीजी सांगतात हे लोक फार धोकादायक नाहीत त्यांच्याकडे दुर्लक्ष केलं तर आपलं काम भागतं. पण दुसरा जो गट आहे तो आहे तुमच्या प्रशंसकांचा. ते तुम्हाला खांद्यावर घेतील डोक्यावर चढवतील पण त्यांच्यापासून अत्यंत सावध रहाणं गरजेचं आहे कारण ते तुम्हाला पतनाच्या घसरगुंडीवर नेऊन बसवतात. त्यांच्या संसारिक अडचणी सोडवण्यासाठी ते तुमचा पाळीव सिंह करून पिंजऱ्यात कोंडतात. ते तुम्हाला तोवरच पाळतात जोपर्यंत तुमच्या संकल्पाने आशिर्वादाने त्याची कामं होतात. एकदा का तुमचा पुण्यक्षय झाला, तुमची तपश्चर्या खर्च झाली की, त्यांच्या दृष्टीने तुम्ही निरूपयोगी होता तेव्हा ह्या म्हाताऱ्या सिंहाला बाहेर काढून ते दुसरा नवीन सिंह शोधायला निघतात.

यावर एकच उपाय आपल्या सद्गुरूंच्या शरणी रहा. माँ भगवतीला कळवळून प्रार्थना करा. सतत ***पाहि माम्। रक्षी माम्*** 'म्हणत रहा नाहीतर ***'त्राही माम्'*** म्हणायची वेळ तुमच्यावर येईल.

साधन मार्गातले इतके बारकावे इतक्या कळवळीने, मायेने, तळमळीने कोण सांगेल? ***'बुडती हे जन न देखवे डोळा'*** या करूणेपोटी स्वामीजी मातृवात्सल्याने आपल्याला हे समजावून सांगत आहेत. त्याचं एकच सांगणं आहे **'स्व' चा अर्थ शोधणारे स्वार्थी व्हा.** या रस्त्याने मी गेलो आहे. हा एकमेव रस्ता तुमच्या शाश्वत धामाला घेऊन जाणारा आहे तो पकडा आणि चालायला लागा. घाबरू नका मी तुमच्या बरोबरच आहे. ***शुभास्ते पंथानः।.... अशा माझ्या प्रेमळ गुरूमाऊलींना माझे कोटी कोटी दंडवत प्रणाम.***

२. कवडसा, ''सविता अर्घ्य'' चा!

– वैद्य ओंकार कोर्टीकर, संगमनेर.

प. पू. स्वामी श्री सवितानंद यांच्या अमृत महोत्सवानिमित्त प्रकाशित केलेली स्मरणिका, ''**सविता अर्घ्य**'' ही खरोखर नावाप्रमाणेच सध्याच्या कलीयुगातील अंध:कारमय कालखंडात धडपडणाऱ्या साधकांना प्रकाशाची वाट दाखविण्याचा स्वामीजींच्या अजोड, अफाट कार्याला दिलेले अर्घ्य आहे!

सर्वार्थाने ही स्मरणिका अद्वितीय कलाकृती ठरली आहे. आजवर आपण सर्वांनी अनेक थोरा–मोठ्यांच्या स्मरणिका बघितल्या असतील. परंतु ''सविता अर्घ्य'' ही स्मरणिका हातात घेताच मुखपृष्ठापासूनच तुमचा वेध घेऊ लागते!

मुखपृष्ठाच्या मागील पानावरचे स्वामीजींची अतीव प्रसन्न मुद्रा आपल्याही मरगळलेल्या मनावर प्रसन्नतेचा शिडकाव करते!

अत्यंत मोठे वेगळेपण म्हणजे ही स्मरणिका पाच खंडामध्ये विभागली गेली आहे!

१) उ:षकाल :

दि. १४ व १५ जुलै २०२१ रोजी नाशिक येथे आयोजित अमृत महोत्सवाच्या कार्यक्रमाचा वृत्तांत.

सरसंघचालक मा. मोहनजी भागवत यांचे वक्तव्य आणि स्वामी सवितानंद यांची 'अमृतवाणी'!

२) सदासर्वदा योग तुझा घडावा :–

स्वामीजींच्या नि:स्वार्थता, निस्पृहता, स्पष्टवक्तेपणा, व्यवहार सांभाळून काम करण्याची वृत्ती अशा अनेक प्रसंगाचे संकलन!

३) विस्मरणाचे स्मरण :–

स्वामीजींच्या गृहत्यागापूर्वीच्या गृहस्थाश्रमातील आयुष्याच्या काही पाऊलखुणांचा मागोवा.

४) तारिणी दुर्ग संसारस्य :–

भवसागरात गटांगळ्या खाणाऱ्या साधकांना हा दुर्गम भवसागर सहज तरून जाता यावा यासाठी स्वामीजींनी त्यांच्या तपश्चर्येत जे अमृतकण हाती लागले, ते साधकाच्या हाती सोपवले अफाट ग्रंथसंपदेच्या रूपाने!

गूढ अशा अध्यात्मशास्त्राचे अनेक सिध्दांत सोप्या भाषेत सर्वसामान्य साधकांसमोर मांडून स्वामीजींनी किती मोठ्या कृपेचा वर्षाव केला आहे ते आर्त भक्तालाच कळू शकते! जिज्ञासा आहे.. पण सत्य कोण सांगणार? हा प्रश्न पडलेल्या, तडफडणाऱ्या साधकाला ही ग्रंथसंपदा म्हणजे, आयुष्यभर दारिद्र्यात पिचणाऱ्या, धडपडणाऱ्या व्यक्तीला, १०० कोटी रूपयांची लॉटरी लागावी! अशीच भावना निर्माण होते!..

यातील काही ग्रंथाचे रसग्रहण, अंशात्मक रूपाने सादर केले गेले आहे.

५) अर्घ्य :–

स्वामीजींच्या प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष कृपेचे जे धनी झाले अशा भाग्यवंताचे लेख यात समाविष्ट आहेत. सर्व

जिज्ञासू साधकांना प्रकाशभूत ठरणाऱ्या या ''सविता-अर्घ्य'' चे संपादक मंडळ हे मला तरी गौरवाचे मानकरी वाटतात!..

स्वामी श्री सवितानंद या ज्ञानसूर्याच्या प्रकाशाला कवेत घेणे हे अफाट काम स्वामीजींच्या कृपेने का होईना पण या संपादक मंडळाने ज्या पध्दतीने पेलले आहे त्याला तोड नाही! त्यांच्या भरीव योगदानामुळेच स्वमीजींचे आयुष्य, त्यांचे अफाट, बहुरंगी, बहुढंगी कार्य अत्यंत नेटक्या आणि अत्यंत देखण्या रूपात सर्वांसमोर आले आहे.

संपादक मंडळाच्या या भगीरथ प्रयत्नाला साथ लाभली आहे ती उत्तम प्रकाशनाची!.. स्मरणिका अशी अर्थगर्भ आहे तशीच ती देखणी आणि दणकटही आहे! उत्तम ग्राफिक डिझाईन, अक्षरजुळणी इ. तांत्रिक बाजू या अव्वल दर्जाच्याच आहेत! यासाठी मुद्रक व सर्व तंत्रज्ञ अभिनंदनास पात्र आहेत!!...

या कार्याकरीता अनेक लेखकांनी योगदान दिले आहे. यामध्ये स्तिमीत व्हायला होते ते एका साधिकेच्या योगदानाने! आमच्या गुरूभगिनी, प.पू. स्वामीजींच्या मानसकन्या, ***''स्वामीजींची सेवा हेच माझे सर्वस्व''*** असे मानणाऱ्या आदरणीय सूश्री सरूताई यांचे योगदान म्हणजे, **"सदासर्वदा योग तुझा घडावा**'' या पूर्ण खंडाचे लेखन आणि स्वामीजींच्या आयुष्याचा, कार्याचा मागोवा घेणारी काव्यसरीता!.. हा खंड वाचताना स्वामीजी जणू डोळ्यासमोर उभे रहातात! अचानक कोर्टकचेरीतून मिळालेले २० लाख रूपये अर्पण करण्यासाठी आलेल्या भास्कर नाईकांना त्यांच्या कौटुंबिक जबाबदाऱ्यांची जाणीव करून देणारे स्वामीजी!.. पुण्याला एका व्यावसायिकाने दिलेले ५ लाख रूपये नाकारून, त्याच्याच विनंतीवरून कोणाच्या मेंदूच्या शस्त्रक्रियेसाठी पोहोचवणे,.. अशा असंख्य उदाहरणातून दिसणारे स्वामीजी जेंव्हा स्वत:चे गृहस्थाश्रमातील घर विकून आलेले पैसे गावालाच देतात, तेंव्हा स्वामीजींच्या नि:संगतेच्या तेजापुढे दीपायला होतं!

भरकटलेल्या संसारी तथा संन्यासी जनांना स्वामीजींनी वेळोवेळी केलेलं मार्गदर्शन, परखड, व्यावहारिक सल्ला.. श्री. अरविंदभाई पटेल यांच्या कॅन्सर निदानानंतर भेटायला गेले असताना, ''कोणता घरमालक चांगला? आत्ताच्या आता घर खाली करा म्हणणारा की सहा महिन्यांची नोटीस देणारा?'' असा सूचक प्रश्न विचारणारे स्वामीजी!.. जगन्नाथपुरीच्या यात्रेत मुक्कामाला थांबलेल्या घरात चार मुली असलेल्या जोडप्याने ''मुलगा व्हावा'' असा अशिर्वाद मागितल्यावर स्वामीजींनी केलेले मार्गदर्शन म्हणजे तीक्ष्ण अंजनच!..

स्वामीजींचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे एखादी व्यक्ती चांगली असेल पण नकळत चूक करीत असेल तर त्या आत्म्याला पुढील पतनापासून वाचवण्यासाठी अत्यंत कुशलतेने चूक दाखवणे आणि प्रसंगी स्वत:ला पणाला लावून ती चूक दुरूस्त करून घेणे! छपरा येथील तरूण व्यापारी अरूण यांच्या बाबतीतली घटना ह्रदयस्पर्शी आहे! अनेक वर्षांपासून आई वडीलांशी बिनसले असल्याने पूर्ण दुरावलेल्या त्या कुटुंबाला एकत्र आणण्यासाठी स्वामीजींनी योजलेल्या युक्ती पाहून नतमस्तक व्हायला होते!...

अनेक प्रसंगातून समोर येणारी स्वामीजींची समयसूचकता, बुद्धीचातुर्य मला वारंवार भगवान

कृष्णांचीच आठवण करून देतं! अशी अनेक वैशिष्ट्ये सूश्री सरूताईंमुळे प्रकट झाली आहेत!

शहाणे करावे जन। पतीत करावे पावन।

सृष्टीमध्ये भगवद्भजन। वाढवावे।।

या समर्थ उक्तीनुसार स्वामीजींचे कार्य चालू आहे.

आध्यात्मिक पातळीवर कार्य चालू असताना, व्यावहारीक पातळीवरही समाजाला सुधारणे गरजेचे आहे हे जाणून वेळोवेळी स्वामीजींनी केलेले मार्गदर्शन किती जणांना, किती प्रचंड लाभदायी ठरले आहे, पतन होण्यापासून वाचवले गेले आहेत याची जाणीव शेवटच्या खंडात होते!

''**बुभूक्षित: कीं न करोति पापम्।**'' असे म्हणतात.. जो भुकेला असतो तो कोणतेही अपकृत्य करू शकतो..

मांडवीमध्येच स्थायिक असलेला एक तरूण, परिस्थितीमुळे गांजून जेव्हा चुकीचे पाऊल उचलत होता, तेव्हा ''पाणी किती आणणार?'' या एका प्रश्नाने त्या युवकाचे आयुष्य कसे बदलले ही कथा अंगावर शहारे आणते!... आत्म्याचा उद्धार होण्यासाठी प्रथम पतन तर थांबले पाहीजे ना!.. स्वामीजी एकमेव अद्वितीय आहेत ते याचसाठी! आत्मोद्धारा आधी लोकोद्धार व्हायला हवा हीच त्यांची धडपड आहे! नांदा सौख्यभरे, सर्व सुखासि पात्र होईजे, साधनापथावर चालताना चुकते कोठे? हे तो प्रचितीचे बोलणे, प्रश्न आमचा उत्तर तुमचे! अशा असंख्य ग्रंथाद्वारे हीच तर धडपड चालू आहे गुरूमाऊलीची!..

माँ शारदेच्या आशिर्वादाने स्वामीजींच्या हस्ते लिहिल्या गेलेल्या या अनमोल ग्रंथराजांच्या महतीचा अनुभव मुरबाड जवळील श्रेष्ठ साधक श्री. मुकुंद वल्लभजी यांनाही आला..! त्यांच्याकडे नेहमी येणाऱ्या एका पती-पत्नींमध्ये वितुष्ट निर्माण झाले. ते एवढे विकोपाला गेले की त्यांनी वेगळे होण्याचे ठरवले. श्री. मुकुंदजींकडे त्यांनी हा मनोदय व्यक्त केल्यानंतर त्यांनी शांतपणे स्वामीजींचे, ''नांदा सौख्यभरे!'' हे पुस्तक काढले आणि त्यांना दिले आणि सांगितले, ''दोघंही शांतपणे हे पुस्तक वाचा.. नंतर निर्णय घ्या!'' आणि मंडळी चमत्कारच झाला! त्यांनी घटस्फोट घेण्याचा निर्णय रद्द केला!! खरे आश्चर्य तर पुढे आहे!.. याच पध्दतीने ''नांदा सौख्यभरे'', या एका पुस्तकामुळे श्री. मुकुंदजी यांनी १०-१२ जोडप्यांना घटस्फोट घेण्यापासून परावृत्त होण्यास मदत केली आहे!

माँ भगवतीच्या कृपाशिर्वादाने प्रकट झालेली ग्रंथसंपदा काय चमत्कार करू शकते हे बघायचे असेल तर नागपूर स्थित श्री. विरेंद्र लोणारे यांचा अनुभव वाचायला हवा!.. अट्टल गुन्हागारी पार्श्वभूमी असलेली ही व्यक्ती! येरवडा जेलमध्ये तुरुंगवास भोगत असताना स्वामीजींची पुस्तके वाचून परिवर्तन झाले! त्यांनी तुरूंगातूनच स्वामीजींना पत्रही पाठवले आणि कमाल म्हणजे स्वामीजींनी त्यांना उत्तरही दिले. यथावकाश शिक्षा संपवून आल्यानंतर काय काय घडले आणि आज ही व्यक्ती सर्व अनुचित कामे सोडून, योग्य - उचीत मार्गाचे कष्ट करून पैसे मिळवून चरितार्थ चालवते आहे हा सर्व अनुभव डोळ्यात पाणी आणणाराच आहे!

''त्वामाश्रितानां न विपन्नराणां, त्वामाश्रिता ह्याश्रयतां प्रयान्ति।'' हे सिध्द करणारा अनुभव!..

''योगिया दुर्लभ, तो म्यां देखिला।'' असे सांगणारा संगमनेरच्या प्रा. डॉ. अनंत दिवेकर यांचा आश्चर्यकारक अनुभव आणि असे अनेकांचे अनुभव स्वामीजींमधील दैवी शक्तीचा परिचय देणारेच आहेत..

या स्मरणिकेच्या शेवटी सी.ए. च्या प्रमाणपत्रासहीत प्रसिद्ध केलेला अमृत महोत्सवाच्या जमा रकमेचा ताळेबंद म्हणजे स्वामीजींच्या नि:स्वार्थ भावनेच, नि:संगतेचं दर्शन म्हणायला हवं!.. ***''आम्ही काय कुणाचे खातो रे। तो राम आम्हाला देतो रे।।''***.. असेच काहीसे हे सर्व!

या प्रकाशपर्वात न्हाऊन निघाल्यानंतर आठवल्या, प्रा. डॉ. दत्ता हसलगीकर (माजी कुलगुरू, मराठवाडा विद्यापीठ) यांच्या कवितेच्या ओळी!

सूर्यकुलाशी ज्यांचे नाते त्यांनी थोडा उजेड द्यावा ।
प्राक्तनाच्या अंधारात प्रकाशाचा गाव न्यावा ।।

सर्व साधकांच्या (वर्तमानातील आणि भविष्यातील), अंधारलेल्या प्राक्तनात प्रकाशाचा उदय करणारे स्वामीजींच्या लोकोद्धार ते आत्मोद्धार या कार्याची अंशात्मक प्रस्तुती, **''सविता–अर्घ्य''** या अप्रतिम स्मरणिकेने झाली आहे.

संपूर्ण भरतखंड आणि विश्व ज्यांना आपल्या तेजाने प्रकाशमान केले आहे त्या परम पूजनीय स्वामी श्री सवितानंद यांच्या चरणी आणि त्यांच्याद्वारे कार्यरत माँ भगवती जगत्जननी भवानीच्या चरणी कोटी कोटी प्रणाम!

स्मरणिकेसंदर्भातील काही वेचक प्रतिक्रिया

स्मरणिका खुप आवडली आहे. मी काही लेख वाचलेत. पूर्ण वाचुन व्हायची आहे. स्मरणिकेतला संपादकीय लेख उत्तम असुन स्मरणिकेच्या अंतरंगाची जाणीव करून देतो. विषयांनुसार पाच भागातली विभागणी उत्तम केली आहे. मांडणी, सजावट, यथोचित सर्व फोटो, ठिकठिकाणी दिलेले मंत्र, ओव्या, अभंग, स्तोत्र यांचा उल्लेख खुप छान आहे. स्मरणिका तयार करतांना व मार्गदर्शनात तुम्ही जीव ओतला आहे. स्मरणिकेचे आयोजन करणाऱ्या आश्रमाच्या दिक्षित साधकांचे टीम वर्क सहभाग, त्यांचे लेख अप्रतिम आहेत. त्यांचे सर्वांचे अभिनंदन. अशी स्मरणिका आधी कधी झालेली नाही व होणारही नाही. तुमच्या कडून यापुढेही ज्ञानपुर्ण मार्गदर्शनपर लेखन होत राहो. कृतज्ञतापूर्वक प्रणाम.

– हिम्मतराव पाटील, मुंबई
(स्वामीजींचे बालमित्र)

स्मरणिका मिळाली. खुप अप्रतिम झाली आहे. मनातल्या बरेच प्रश्नांची स्मरणिका वाचतांना आपोआप उकल झाली. स्वामीजी, आपल्या व्यक्तिमत्वातील गुणांची नव्याने ओळख झाली. सदैव कृपादृष्टी असू द्यावी!

– संजय कोल्हे, खामगाव

३. 'सविता अर्घ्य' सिंहावलोकन

– आप्पाराव कुलकर्णी, लातूर

काळ हा जसा अनंत आणि अनादी आहे, तसाच तो अगम्यही आहे. त्याच्या उदरात साठवलेल्या अगणित घटनांचे ज्ञान कोणाला झाले आहे? असंख्य विलक्षण घटनांना वर्तमानात रूपांतरीत करून, मानवाला – सर्व समाजाला कधी आश्‍चर्याने स्तंभित करत तर कधी गूढतेत गुंग करत, कधी दु:खाचे टोले मारत तर कधी सौख्याच्या हिंदोळ्यावर झुलवत, कधी आशेने पल्लवीत करत तर कधी नैराश्याचे चटके देत, तो सारखा झरझर वाहत आहे. सुखदु:खाच्या नि आशा–निराशेच्या कचाट्यात मानवाला पकडून त्याची गंमत करण्यात काळाला काय आनंद वाटत असेल ते वाटो! पण अशाही काळात वेध घेऊन, त्याच्या उदरस्थ घटनांचे अवगाहन करून, परिस्थितीचे अचूक निदान करणाऱ्या, भविष्यात घडणाऱ्या घटनांची मानवाला–समाजाला–राष्ट्राला चेतावणी देणाऱ्या, आज होत असलेल्या सव्यापसव्य घटनांचा समाजावर देशावर पुढे काय परिणाम होईल याची जाणीव देणाऱ्या कांही महान विभूती असतात, त्यांना 'द्रष्टा' असे म्हटले जाते. या 'सविता अर्घ्य' स्मरणीकेचे अवगुंठन केल्यानंतर मला वंदनीय सवितानंद स्वामीजी हे द्रष्टे युगपुरूष वाटतात. या भारत देशात भूतकाळात आता आणि भविष्यात असा तेज:पुंज परंपरेचा प्रवाह अनादी काळापासून चालत आलेला आहे. तो आता वंदनीय स्वामी सवितानंदाच्या रूपाने – पुस्तकातून – त्यांच्या प्रवचनातून – त्यांच्या सहवासातून समाज स्तर उच्च तथा समृद्ध करीत वहात आहे.

'सविता अर्घ्य' या स्मरणिकेत पाच भागामध्ये बावन्न पुष्पांच्या सहाय्याने विविध स्तरातील व्यक्तींना भावलेले स्वामीजी त्यांनी शब्दबद्ध केलेले आहेत. त्यांची नावे सुध्दा अत्यंत समर्पक दिलेली आहेत. १) उष:काल २) सदा सर्वदा योग तुझा घडावा ३) विस्मरणाचे स्मरण ४) तारिणी दुर्ग संसार सागरस्य ५) अर्घ्य ही एक पंचपदीच आहे.

वंदनीय स्वामीजींच्या अमृत महोत्सवास जगातील सर्वश्रेष्ठ संघटनेचे सरसंघचालक आपला वर्षभर अगोदर ठरलेला प्रवास मागे–पुढे करून समारंभास उपस्थित राहिले हीच वंदनीय स्वामीजींची उंची दाखवणारी घटना आहे.

पूजनीय सरसंघचालक श्री. मोहनजी भागवत यांनी आपल्या मार्गदर्शनपर व्याख्यानात पाश्चात्य तत्वज्ञानासह भारतीय तत्वज्ञानावर सविस्तर उहापोह केलेला आहे. उपनिषदातील उदाहरणासह साधार विवेचन केलेली आहे. भारतीय तत्वज्ञान जे सांगते मग ते पुनर्जन्म व मानव जन्मात नवीन करता येण्यासारखे आणखी कांही यावर तर्कनिष्ठ विवेचन केले आहे. पाश्चात्य तत्वज्ञानासह भारतीय तत्वज्ञानातील तत्वज्ञांचे जसे श्री तुकाराम महाराज, श्री ज्ञानोबा माऊली यांच्या तत्वज्ञानाच्या आधारासह विस्तृत विवेचन केले आहे. ''**साधना एकांतात तर परोपकारत समाजात**'' अशा विचारासह साधार विवेचन केले आहे. साधनेचे दोन प्रकार – एक पिपीलिका मार्ग व विहंगम मार्ग या उदाहरणानी पूजनीय सरसंघचालकांनी त्यांच्या मार्गदर्शनाचा शेवट केला

आहे.

वंदनीय स्वामी सवितानंदानी आपल्या मार्गदर्शनात जे सांगितले ते वाचल्यावर आद्य शंकराचार्यांचे स्मरण होते – मी कोणीच नाही तर माझ्याकडून करवून घेतलं जात आहे मी तसा पामरच पण त्याची कृपा सर्व करवून घेत आहे हे सूत्र समोर ठेवून वंदनीय स्वामीजींनी आपणा सर्वांसमोर त्यांच्या विचाराचे दालन उघडे केले आहे. हे शरीर राहिल न राहिल पण हे कार्य **''हे मजचिस्तव जाहले। परी म्यां नाही केले।।''** या ज्ञानेश्वरीतील ओवीने त्यांच्या कार्याचे मोल त्यांना आपल्यासमोर मांडले आहे.

वंदनीय स्वामीजी जे काम करीत आहेत – मग ते लेखनाच्या माध्यमातून, प्रवचनाच्या माध्यमातून, सहज गप्पातून ते सर्व ती भगवती त्यांच्याकडून करवून घेते आहे त्या मनोभावनेत स्वामीजी वावरतात हे त्यांनी दुर्गा सप्तशतीतील एका श्लोकाने उदाहरण देऊन सांगितले आहे. तो श्लोक असा.

''त्वामाश्रितानां न विपन्नराणां त्वामाश्रिता ह्याश्रयतां प्रयान्ति।'' हे भगवती जो तुझ्या आश्रयाला येतो त्याची ती विपन्नावस्था राहतच नाही, तर तो दुसऱ्याला आश्रय देऊ शकेल इतका सक्षम होतो. म्हणजे सर्व श्रेय माँ भगवतीलाच स्वामीजींनी दिलेले आहे. म्हणजे ''मैं नही तू ही'' या सूत्राने स्वामी सवितानंदजी दररोजच्या जीवनात वावरत असतात. कारण सहज बोलण्यात ते विनोद करतात, शब्द कोटी करतात, लहान मुलाशी सहज सलगी करतात यातून हे स्पष्ट जाणवते.

वंदनीय स्वामीजींनी अमृत महोत्सवात दिलेल्या प्रवचनात सहज लीलया रामचरित मानस, दुर्गासप्तशती, गीता, ज्ञानेश्वरी उपनिषद, महाभारत इत्यादी ग्रंथातील तेजोमयी विचार मौक्तिक याची उधळणच आपल्या सर्वांवर केलेली आहे. आपण सर्वांनी आग्रहाने त्यांच्या अमृत महोत्सवाचा कार्यक्रम साजरा केला. त्यांनी त्यांच्या अमृतवाणीने जीवनभर पुरेल एवढे संचित त्यांच्या त्या प्रवचनात मुक्तहस्ताने सर्वांना दिलेली आहेत. आजच्या प्रचंड वेगवान विज्ञान तंत्रज्ञान युगात वावरत असताना प्रत्येकाचे पाय या संस्कृतीच्या मुळाशी घट्ट रोवलेले राहिले तर कितीही वादळे वा संकटे आली तरी समृद्ध जीवनाचा वृक्ष उन्मळू शकत नाही असा आत्मविश्वास वंदनीय श्री स्वामीजींनी ह्या प्रवचनातून दिलेला आहे. हे पायस आयुष्यभर पुरणारे आहे.

श्री. अविनाशजी काळे यांनी समारंभापूर्वीची मानसिकता उत्तम शब्दात मांडली आहे. जसे खूप दुरून देवालयाचे शिखर दिसते पण जवळ गेल्यावर काहीत दिसत नाही पण तसेच थोडे अंतर चालल्यावर देवळाचा गाभाराच प्राप्त होतो. तसे समारंभ कसा? केव्हा? किती उपस्थिती? कोरोना काय करतो? शासनाचे नियम? अश्या अनेक व्यथांनी द्विधा झालेली मनोअवस्था श्री. काळे यांनी मांडलेली आहे. पण वंदनीय श्री स्वामी सवितानंदाजीचे कर्तृत्व असे की, जगप्रसिध्द संघटनेच्या सरसंघचालकानी आपल्या कार्यक्रमात बदल केला ही ''अहोभाग्य'' अशी घटना आहे. त्यामुळे कार्यक्रमाची उंची एका दिव्य स्तरावर गेल्याची ही पावती आहे.

माननीय अध्यक्ष श्री. नंदकिशोर बाविस्कर यांनी ''धन्य मी कृतार्थ मी'' या उत्कट आणि आनंदी शब्दामध्ये या एकूण समारंभाचे फलित व्यक्त केले आहे.

स्मरणिकेच्या दुसऱ्या भागात वंदनीय स्वामीजींच्या अष्टपैलू व्यक्ती त्यांची ओळख करण्याचा एक प्रयत्न आहे. जसे परिपूर्ण उमललेले फूल त्याच्या अस्तित्वाने सर्व दिशेला परिपूर्ण सौंदर्य प्रदान करीत डौलाने

वाऱ्यावर डुलत सृष्टीची शोभा वाढवित असते. तसे या दुसऱ्या भागात विविध उदाहरणे, घटना, प्रसंग देऊन दैवी संपदेने नटलेले व्यक्तिमत्व कसे समाजोपयोगी कार्य करते याचा तो मन आनंदीत करणारा, मनाला भारून टाकणारा व बुवाबाजीचा बुरखा फाडणारा, गुरू असा असावा? त्याने किती साधेपणाने राहिले पाहिजे? गुरूने केवळ आपल्याकडचे ज्ञान अधिकाअधिक सहजपणे सर्वांसाठी खुले करून दिले पाहिजे, निगर्वी राहता येणे आणि समोरच्याच्या मनातील गर्व नाहीसा करणे हे अवघड काम वंदनीय स्वामीजींनी किती सहज लीलया पार पाडले आहे. हे सर्व त्यांनी भारतीय संस्कृतीच्या मूळ अभ्यासातून साध्य केलले आहे. जीवनात कितीही संकटे आली, कितीही वादळे आली तरी समृध्द जीवनाचा वृक्ष उन्मळू शकत नाही असा आत्मविश्वास या दुसऱ्या भागातून वाचकाच्या प्रत्ययास येतो.

हे प्रकरण वाचल्यानंतर 'गुरू' संबंधी एक सुभाषित आठवले ते असे –

शान्तोदान्तः कुलीनस्य विनीत, शुद्ध वेषवान्।
शुध्दाधारः सुप्रतिष्ठः शुर्चिदक्षः सुबुद्धिमान्।
अध्यात्मज्ञान निष्ठस्य मन्त्र तंत्र विशारदः।
निग्रहानुग्रहे शक्तो गुरूरित्याभिधीयते।।

शांत, इंद्रियदमन करणारा, कुलीन, विनीत, शुद्ध वेष व शुद्ध आचार असलेला, प्रतिष्ठित, पवित्र, दक्ष, उच्चतम् बुद्धि असलेला, अध्यात्म आणि ध्यान याबद्दल निष्ठा असलेला, मंत्र व तंत्र यांचे मान असलेला, कृपा व शासन दोन्ही करून शकणारा असा पुरूष गुरू या पदवीस पात्र असतो.

पुनः पुन्हा वाचन करावे असा हा ''सदा सर्वदा योग तुझा घडावा'' असा हा भाग आहे.

''विस्मरणाचे स्मरण'' हा सहा लेख असलेला वंदनीय स्वामीजींच्या गतायुष्यातील जीवनावर आहे. त्यांचे बंधू, वर्गमित्र, दुसरे नातेवाईक यांनी त्यांच्या संन्यास घेण्यापूर्वीच्या आयुष्यावर आधारित लेख आहेत. त्यातील त्यांच्या विवाहाची घटना ही अतर्क्य अशा श्रेणीतील आहे. शाळकरी आयुष्यातील घटना, महाविद्यालयीन जीवनातील आठवणी अशावर आधारीत हा भाग आहे. हा भाग वाचल्यानंतर एका सुभाषिताची प्रकर्षाने आठवण झाली ते असे आहे.

बाल्यं काव्यमिती प्राहुः संगीतं यौवनं विदुः।
तत्वज्ञानं च वार्ध्यक्यं रम्यं सर्वत्र जीवनम्।।

याचा अर्थ असा आहे की, माणसाचे बालपण काव्यासारखे मधुर आहे. तर तारूण्य संगीतासारखे धुंद करणारे व वार्धक्य तत्वज्ञानासारखे गंभीर व शांत तर हे जीवन सर्वश्च रम्य व सुंदर आहे. वंदनीय स्वामीजींच्या जीवनाला हे सर्व लागू आहे असे मला वाटते. श्री. नंदकिशोर बाविस्कर यांनी वंदनीय स्वामीजींच्या घराण्याविषयी सविस्तर माहिती दिलेली आहे हे वाचल्यावर मला एका सुभाषिताची आठवण झाली. ते सुभाषित असे आहे.

सुशीलो मातृपुण्येन पितृपुण्येन चातूरः।
दातृत्वं वंश पुण्येन आत्मपुण्येन स्वभाग्यतः।।

अर्थ – आईच्या पुण्यामुळे मुलगा सुशील तथा चांगल्या चारित्र्याचा होतो तर वडीलांच्या पुण्याईने चतूर होतो.

वंशाच्या तथा कुळाच्या पुण्याईने दानशूर होतो तर स्वत:च्या पुण्याईने भाग्यवान होतो.

वंदनीय स्वामीजींच्या जीवनाला हे लागू पडते असे मला वाटते. या भागातील शेवटचा लेख आदरणीय सरूताई यांनी काव्यरूपाने वंदनीय स्वामीजींच्या जीवनपटाची माहिती व स्वामीजींनी लिहिलेल्या सर्व ग्रंथाची एक काव्यमाला सादर केलेली आहे. लिखाणाची एक वेगळीच शैली कवयित्रीने या ठिकाणी वापरली आहे. यमक अलंकारयुक्त ही काव्यसरीता अत्यंत ओघवती झाली आहे. स्वामीजींच्या जन्मापासून बालपण, विद्यार्थीदशेतील खडतर काळ, गृहत्याग, गुरुकृपा, संन्यास व भारत भ्रमण या प्रवाहातच स्वामीजींनी लिहिलेल्या सर्व ग्रंथांची नावे कवितेत मोठ्या चपखलपणे गुंफली आहेत. पॅटर्न (पध्दत) येथे त्यांनी लिहीलेला आहे. अगदी यमक हा अलंकार येथे सादर केलेला आहे. जवळपास वंदनीय स्वामीजींच्या जीवनाचे समीक्षणात्मक लेखन करून स्वामीजींच्या जीवनाचा परिचय दिलेला आहे.

वंदनीय स्वामीजींच्या या 'सविता अर्घ्य' या स्मरणिकेतील हा चौथा भाग, हा अकरा लेखांनी संपन्न झालेला आहे. वंदनीय स्वामीजींचे ग्रंथरूपातील जे विचार समाजासमोर आलेले आहेत. त्यावर या विविध स्तरातील मान्यवर बंधू-भगिनीनी आपले विचार मांडलेले आहेत. ''विचार ग्रंथरूपाने एक पण दृष्टीकोन अनेक'' असे या भागाचे साधारणपणे स्वरूप आहे. स्वामीजींचे लिखित ग्रंथ वाचल्यावर आपल्याला काय भावले, काय वाटले, वर्तनात कांही बदल झाले का? मानस पातळीवर काय काय घालमेल झाली. या ग्रंथाच्या मुखपृष्ठावर असलेले चित्र, त्यातून प्रतिबिंबित होणारे निरनिराळे दृष्टीकोन वा अर्थ यावर मान्यवरांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत.

काहीनी पत्राद्वारे, वंदनीय स्वामीजींच्या पूर्व आयुष्यातील मित्रांनी, काही उच्च विद्याविभूषित महिला साधकांनी त्यांना वंदनीय स्वामीजींच्या सहवासातून, त्यांच्या ग्रंथातून जी अनुभूती आली ती त्यांनी शब्दांकित केलेली आहे. जणू कांही हे जीवन म्हणजे एक महासागर आहे. त्यातून तरून जाण्यासाठी वंदनीय स्वामीजींच्या ग्रंथाचा उपयोग हा होडी किंवा जहाजासारखा होता अशा अर्थाने या भागास ''तारिणी दुर्ग संसारसागरस्य'' हे अत्यंत सार्थक नाव या भागास दिलेले आहे.

हा भाग वाचल्यावर हे लक्षात येते की ही स्मरणिका ज्या चमूने तयार केली आहे त्यामागे प्रचंड विचार विनिमय, खूप कठोर परिश्रम, केलेले आहेत. या स्मरणिकेस केवळ लांबी रूंदीच आहे असे नाही विचारांची प्रचंड खोली, गहनता, सहजता याचे उत्तम दर्शन या स्मरणिकेत होते. जसे एखाद्या बागेचे दर्शन पहाटे पाच वाजता होते व जस जसे उजाडत जाते तसतसे त्या बागेचे दर्शन अधिकच स्पष्ट, अधिक सुंदर होत जाते तसे हा चौथा भाग आहे. या इंग्रजीत Progressive unfoldement असे म्हटले जाते. जसे जसे वंदनीय स्वामीजींचे वाङ्मय वाचीत जावे तसे तसे अजून जास्त समजत जाते हा वंदनीय स्वामीजींच्या लेखनाचा विशेष भावणारा भाग आहे.

वंदनीय स्वामीजींच्या व्यक्तिमत्वाचे एक भव्य, वेगवेगळे पैलू दाखवणारे अनुभव या शेवटच्या ''अर्घ्य'' या भागात लेख रूपाने आले आहेत. एकूण एकोणीस लेख तथा आलेले वेगवेगळे अनुभव यात आलेले आहेत व शेवटच्या दोन लेखात अमृत महोत्सवात झालेल्या खर्चाचे विवरण दिले आहे. ''शिवभावे

जीवसेवा'' हा संदेश स्वामी विवेकानंदानी दिला. त्याचे कृतीरूप दर्शन श्री राकेशभाई ईश्वरलाल सोनी, मांडवी, श्री नरेद्रसिंह मुळोदरा, तरसाडा, श्री. विरेंद्र लोणारी, नागपूर, वीणाबेन सुथार उपेरा, पं. शनिकुमार (लालजी महाराज) व्यास, मांडवी इत्यादी भक्तमंडळींच्या लिखाणातून आपणास होते.

तसेच वंदनीय स्वामीजींच्या जीवनाचे, लिखाणाचे महत्व मा. श्री भैय्याजी (सुरेश) जोशी, नागपूर, श्री. रवींद्रजी भुसारी यांच्या लिखाणातून प्रत्ययास येते. तसेच आदरणीय दाजीकाका पणशीकर यांच्या लेखातून 'तप श्रीमंत सवितानंद' यातून वंदनीय स्वामीजींचा तेजस्वी जीवनाचा विरागी विक्रमादित्य असा परिचय वाचकांस होतो.

परमपूज्य स्वामी श्री सवितानंद सेवा समितीने या स्मरणिकेद्वारे या काळातील मनुष्य रूपात अवतारी – महात्म्याचे एक दिव्य दर्शन वाचकांच्यासमोर ठेवलेले आहे. एक अत्यंत नि:स्पृही, तपस्वी, षडरिपूजेता, मनुष्यरूपात वावरणारे अर्थावतार, निरासक्त आचरणनिष्ठ, आत्मसाक्षात्कारी, आचारनिष्ठ तपस्येने कृतार्थ असलेले ओजस्वी नम्रतेने, चपलख विनोद करणारे शब्दप्रभू, अखंड आनंदाने विहार करणारे तसेच प्रत्यक्षात ज्यांच्या व्यक्तित्वाला गंगेचे मांगल्य, सरस्वतीचे साफल्य, यमुनेचे खळाळणारे जीवन जीवनात आणणाऱ्या वंदनीय स्वामी सवितानंद यांच्या चरण कमलावर हे लेखन समर्पण करून, अनन्यभावाने शरण जाऊन लेखणीला विराम देतो.

स्मरणिकेसंदर्भातील काही वेचक प्रतिक्रिया

स्वामीजी सादर प्रणाम,

स्मरणिका मिळाली. खूपच सुंदर झाली आहे. खास करून आपल प्रवचन खूपच भावल. माझा मुलगा वीस वर्षाचा आहे त्याला ही ते वाचून दाखवलं. त्याला ही ते मनापासून आवडलं. मुलाला सध्या कोविड १९ चे इन्फेक्शन झाले आहे. त्याच्या अजून काही टेस्ट करावयाच्या होत्या त्यामुळे आपल्याला कळवायला उशीर झाला. असो. नाशिकच्या कार्यक्रमाला उपस्थित राहता आले नाही याची चुटपूट होती पण स्मरणिका पाहून काही अंशी कमी झाली. पुन:श्च प्रणाम.

– सुजित काटकर, पुणे

काल स्मरणीका मिळाली. श्री राकेशभाई सोनी यांचा पाणी किती आणणार? अनुभव वाचुन भारावलो एखादयाच आयुष्य उभं करणं म्हणजे काय? याचा प्रत्यय येतो.

– सुनील पाटील, मुंबई

४. स्तोत्रमंत्राचे विज्ञान व सन्तु निरामया: रसग्रहण –वैद्य. लक्ष्मीकांत कोर्टीकर, अ.नगर

तमाम भारतीयांना स्तोत्र, मंत्राबद्दल कुतुहल आहे, आकर्षण आहे, श्रद्धा आहे, विश्वास आहे. पिढ्यान् पिढ्या ही स्तोत्रे घराघरात पुढच्या पिढ्यांना शिकवली जात आहेत. या स्तोत्रामागे काही विज्ञान आहे? मंत्रशास्त्र हा ही असाच विषय भारतीयांचे हृदयाजवळचा

अमंत्र अक्षरंनास्ती नास्तीमूलं अनौषधम्।
अयोग्यो पुरूष नास्ती योजकस्तत्र दुर्लभ: ।।

या सुभाषिताप्रमाणे बोलायचे झाले तर सर्व अक्षरे ही मंत्रस्वरूप आहेत, पण ती कधी, कुठे, कशी वापरायची याची योजना माहिती असणारा अतिशय दुर्लभ आहे. मंत्रांमागेही विज्ञान आहे. अनेक वर्ष हा प्रश्न मलाही पडलेला होता. आयुर्वेदामध्ये चरकसंहितेमध्ये चिकित्सेचे ३ प्रकार पाडलेत. १) युक्तिव्यपाश्रय २) सत्वावजय ३) दैवव्यपाश्रय! तर ही दैवव्यपाश्रय चिकित्सेजीचा आम्ही कधीही अभ्यास केला नाही कारण यावर परीक्षेत कधीच प्रश्न विचारले जात नाहीत. मंत्र औषधीधारण, मणिधारण मंगलकार्य आदि अथर्वण चिकित्सेवर आज कोणचाही विश्वास नाही. काळाचे अपेक्षेने आऊटडेटेड!

अशा पार्श्वभूमीवर प. पू. स्वामी सवितानंद यांचे 'स्तोत्रमंत्राचे विज्ञान व सन्तु निरामया:' हे पुस्तक माझ्यासारख्या जिज्ञासूसाठी अलिबाबाची गुहाच! स्वामीजी विज्ञान क्षेत्रातील उच्चपदवी संपादित असल्याने स्तोत्र मंत्रांकडे पाहण्याची वेगळी दृष्टी साधनेतून तयार झाल्याचे लक्षात आले. हे पुस्तक वाचावयास सुरवात केल्यावर लगेच लक्षात येते की कथा कादंबरीसारखे एका बैठकीत धाडधाड वाचण्याचे हे पुस्तक नव्हे. प्रत्येक पान दोन तीन वेळा वाचल्यावर मग काहीतरी कळल्यासारखे वाटू लागते.

स्वामीजींची साधना अतिउच्च कोटीची आहे. सकाळी नवचंडी पाठाला बसल्यावर जर त्यांचे समोर बसून जप केला, स्तोत्रपठण केले, ध्यान केले, पाठ केला तर काही क्षणात अष्ट सात्विकाभाव जागृत होवू लागतात, हा लेखकाचा अनेक वर्षाचा अनुभव आहे. अशा ब्रह्मनिष्ठ, तपोनिष्ठ अधिकारी व्यक्तीस त्यांच्या साधनेमधून स्फुरलेले उपाय आपण नि:शंक होवून फक्त आचारावे उगीचच फाटे फोडू नये!

सांगण्यास खूप आनंद होतो की, पूर्ण भारतभर व भारताबाहेरही असे अनेक साधक आहेत. त्यांनी स्वामीजींनी सुचवलेले वेगवेगळे मंत्र स्तोत्रांचे पाठ करून व्याधीमुक्त झाले. या पुस्तकामध्ये ज्या ज्या साधकांची उदाहरणे स्वामीजींनी दिली आहेत त्या बहुतेक सर्व जणांना मी व्यक्तीश: भेटलो आहे. त्यांच्या मुखातून हे प्रसंग ऐकतांना पुन: पुन: लक्षात येते की, स्वामीजी हे जगदंबस्वरूप आहेत, माऊली आहेत.

अगा बावन्न वर्णापरता। कोण मंत्रु आहे पंडु सुता।।
का बावन्न हिनु चरिता। जीवु आधी।।
परी मंत्राची कडसणी। जव नेंविजे कोदंडपाणी।।
तव उच्चार फळवाणी। न ऐवेजेवी।। (ज्ञानेश्वरी १८/३७३/७४)

ज्ञानेश्वर माऊली म्हणतात, बाराखडी म्हणली की त्यात सर्व मंत्र येवून गेले असे घडते का? प्रत्येक अक्षर हे बीजमंत्र आहे. फार मार्मिक व रहस्यपूर्ण विधान आहे.

स्तोत्रमंत्रांची निर्मिती करून ऋषीमुनी, संतांनी मानव जातीवर अनंत उपकार केले आहेत. मंत्रांची निर्मिती हे भाषाप्रभूचे काम नाही तर **तेथे पाहिजे जातीचे!** तपोनिष्ठ, ब्रह्मनिष्ठ ऋषीमुनींनी त्यांचे साधनेतून निर्माण झालेल्या ऋतूंभरा प्रज्ञेतून हे जाणले की कोणत्या अक्षरांची मेळवणी केली की कोणते ध्वनीतरंग निर्माण होतील? त्यांचा मानवास शरीर मानस लाभ कसा होईल? त्याची अंत:करण शुद्धी कशी होईल? आधि व व्याधींचा विचार करून या स्तोत्र मंत्रांची निर्मिती केली आहे.

मैत्रीसाठी उपनिषदामध्ये म्हटले आहे की,

द्वे ब्रह्माणि वेदितव्ये तु शब्द ब्रह्म परंचयत्।
शब्द ब्रह्माणि निष्णात: परं ब्रह्मादि गच्छति।।

ब्रह्म हे २ प्रकारचे असते. शब्द ब्रह्म आणि प्रकाश ब्रह्म/परब्रह्म।

जो शब्द ब्रह्म जाणतो तो परंब्रह्मास जाणू शकतो याचा अर्थ मंत्राद्वारे आपणास या सर्व सृष्टीच्या मूळ तत्वाचे ज्ञान होवू शकते.

योगशास्त्रामध्ये मानवी शरीरात षट्चक्रे वर्णन केली आहेत. त्यांना विशिष्ट संख्येत पाकळ्या आहेत, त्यांना विशिष्ट रंग आहे, त्यांना विशिष्ट बीजमंत्र आहेत. मूलाधारास ४, स्वाधिष्ठानास ६, मणिपूरास १०, अनाहतास १२, विशुद्धास १६ आज्ञाचक्रास २ अशा ५० पाकळ्या आहेत.

संस्कृत भाषेत ५० वर्णाक्षरे आहेत. ती एकेका पाकळीचा बीजमंत्र आहेत. या बीजमंत्राचे विशिष्ट तालात, लयीत विशिष्ट संख्येत विशिष्ट वेळेस उच्चारण केले तर जी कंपने निर्माण होतात त्यांनी शरीर मानस लाभ होतातच पण अंत:करण शुद्धीही होते. क्वचित प्रसंगी बीजमंत्रांचा रोगनिवारणार्थ वापर केला गेला. वेगवेगळे मंत्र जे तयार झाले त्यामुळे कोणता लाभ होईल? ते कोणत्या चक्रावर परिणाम करतील? शरीरावर, मनावर काय परिणाम करतील? याचे मोठे शास्त्रच निर्माण झाले. असे म्हणतात की देवी आराधनेचे एक लाख सत्तावीस हजार ग्रंथ होते. त्यापैकी आजमितीस पाच हजारही उपलब्ध नाहीत. नालंदा, तक्षशिला येथील अपार ग्रंथसंपदा ही अग्नये स्वाहा करविल्याने मानव जातीचे अपार नुकसान झाले आहे.

अलिकडच्या काळामध्ये स्वर विज्ञान, ध्वनी विज्ञान या क्षेत्रातील शास्त्रज्ञांचा भारतीय स्तोत्र मंत्रांवर संशोधन करण्यात रस वाढला आहे.

1. Science of sound in Hinduism by Dr. M.G. Prasad.
(https://youtube/&GFaAZ55ymO),
2. Science of Mantra (Metaphysics to Biophysics) by Dr. Rama Jaysundar
(https:/youtu.be/3DLIAEIKSYC).

वानगी दाखल काही संशोधकांची भाषणे येथे दिली आहेत. जिज्ञासूंनी अवश्य बघावी. मंत्राप्रमाणेच स्तोत्रांचा पाया हा ध्वनितरंगाचा आहे. लयबद्ध पद्धतीने, विशिष्ट वेळी, विशिष्ट हेतूने, विशिष्ट संख्येमध्ये,

एकाग्रचित्ताने केलेल्या स्तोत्र पठणामुळे विलक्षण परिणाम दिसून येतात. या परिणामानुसार स्तोत्रांचे विविध प्रकार पडतात. उदाहरणार्थ देवतांची स्तुती, कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी, अपराधक्षमापनेसाठी, यशप्राप्तीसाठी, विजय प्राप्तीसाठी, ग्रह अनुकूलतेसाठी, शांतीप्राप्तीसाठी, प्रज्ञाविवर्धनासाठी, संतानप्राप्तीसाठी, ऋणमुक्तीसाठी, सद्गुरूप्रसाद प्राप्तीसाठी, विविध देवतांची कवच वगैरे वगैरे.

या पुस्तकामध्ये स्वामीजींच्याकडून यशस्वीपणे प्रयोग करण्यात आलेल्या काही स्तोत्रांचा उल्लेख येतो. जसे शिवतांडवस्तोत्र, श्रीरामरक्षा, अथर्वशीर्ष, अदित्यहृदयस्तोत्र, ललितासहस्त्रनाम, विष्णूसहस्त्रनाम, शिवसहस्त्रनाम, भवानी अष्टक, अर्गला स्तोत्र, श्री सूक्त, गजेंद्रमोक्ष स्तोत्र, षष्ठीदेवी स्तोत्र, दुर्गाद्वात्रिंशन्नाममाला, सूर्य स्तोत्र, हनुमान चालिसा, करूणा त्रिपदी, अष्टध्यायी रूद्रपाठ तसेच देवीसप्तशतीमधील काही मंत्रप्रयोग ज्ञानेश्वरीमधील मंत्रप्रयोग, श्रीमत् भगवतगीतेमधील मंत्रप्रयोग, हरे राम महामंत्र, महामृत्युंजय मंत्र, नामत्रय, गायत्रीमंत्र, ओंकार, पसायदान, गुरू चरित्र इ. याशिवाय सूर्यास जल अर्घ्य, औदुंबर प्रदक्षिणा, दूर्वा आदींचा यथायोग्य वापर कसा करावा याचे मार्गदर्शन लाभते.

औदुंबराचे सान्निध्यात करूणा त्रिपदी पाठ केल्याने शरीर मानस दाह कमी होऊन शांती लाभते. या तंतूचा आधार घेत लेखकाने औदुंबर वृक्षावरती संकेतस्थळ बनवले. (www.audumber.com.in) जिज्ञासूंनी अवश्य भेट द्यावी.

गणपती अथर्वशीर्ष म्हणजे गणेशाची वाङ्मयमूर्ती, थर्व म्हणजे चंचल, अथर्व म्हणजे स्थिर, ज्या स्तोत्राचे पाठ केल्याने बुद्धी स्थिर होते, एकाग्र होते ते स्तोत्र अथर्वशीर्ष. जी मुले खूप चंचल असतात, आईवडीलांची आज्ञा पालन करत नाही, शाळेत नेहमी दंगा करतात अशांसाठी अथर्वशीर्षाचे नियमित पठण हा खूप प्रभावी उपाय ठरू शकतो. मुल लहान असेल तर पालकांनी त्याला मांडीवर बसवून अथर्वशीर्षाचे पाठ करावेत. त्याचेकडून प्रज्ञाविवर्धन स्तोत्र पाठ करून घ्यावे, उगवत्या सूर्याला अर्घ्य द्यावे अशा उपायांनी हे मूल मेधावी बनू शकते.

स्तोत्रमंत्रांनी रोगोपचार या अध्यायामध्ये स्वामीजींनी त्या रोगांच्या उत्पत्तीच्या कारणांविषयी वैज्ञानिक पद्धतीने आध्यात्मिक उत्तरे दिली आहेत. प्रज्ञापराध, पीडितांचा तळतळाट, पूर्वजन्मकृत कर्म विपाक, ग्रहांची भ्रमणे, वास्तूदोष, पितृदोष, अतृप्त आत्मे, अतिचिंता, कुपोषण, निसर्गाची प्रतिकूलता वगैरे.

आजच्या वैद्यकशास्त्राला हे पटणे अशक्य आहे. पण एखाद्या मान्यवर वैद्यकसंस्थेने स्वामीजींनी एवढ्या ठामपणे मांडलेल्या मतांवर जरूर संशोधन करावे. आज वैद्यकशास्त्रामध्ये ज्यांची कारणेच माहिती नाहीत पण ते आजार आहेत असे असंख्य आजार, सिन्ड्रोम आहेत. स्वामीजींचे मताचा अंगीकार केला तर बराच्यशा आजारांची कारणे कळू शकतात. हा भावी संशोधकांसाठी स्वामीजींनी दिलेला गृहपाठ आहे!

स्वामीजींचे ज्ञानेश्वरीवर विशेष प्रेम आहे. महाराष्ट्रात जन्म घेवून ज्ञानेश्वरी वाचलीच नाही तो करंटा! एवढ्या तीव्र शब्दांचा स्वामीजी उल्लेख करतात. ज्ञानेश्वरीचा भक्तमंडळींनी आध्यात्मिक, तत्वज्ञान, साहित्य, काव्य इ. दृष्टीकोनात अभ्यास केला आहे, पण रोगमुक्तीसाठी ज्ञानेश्वरी असा कुठेही अभ्यास झालेला नाही. स्वामीजी विविध विकारांवर ज्ञानेश्वरीतील काही ओव्यांची आवृत्ती करायला सांगतात. त्याचा अगदी विलक्षण

परिणाम होताना दिसतो.

आम्ही विविध शहरात असणारी वैद्यमंडळी त्यांच्या वचनांचा आधार घेत पेशंटना सांगतो. बघता बघता पेशंट बरा होतो. तो आम्ही यशाचे धनी होतो. खरे तर यशाचे धनी स्वामीजीच आहेत. त्यांनी सांगितले नसते तर.... ?

स्वामीजी वर्षानुवर्षे प्रतिदिन देवी सप्तशतीचा पाठ प्रात:काळी करत असतात. जशी गीता ही ७०० श्लोकांची आहे तशी सप्तशती ही देखील ७०० श्लोकांची आहे. जनसामान्यात विद्वानांमध्ये भगवतगीता जेवढी लोकप्रिय तशी सप्तशती नाही ही खंत त्यांचे मनात असल्याने स्वामीजींनी सप्तशती रहस्य उलगडून सांगणारी ३ पुस्तके लिहून साधकांवर प्रचंड उपकार केले आहेत.

१) महामाया प्रभावेण

२) मी तू पणाची झाली बोळवण

३) रात्रंदिन आम्हा युध्दाचा प्रसंग

जिज्ञासूंनी ती अवश्य वाचावी ही कळकळीची विनंती!

स्वामीजींच्या मते चण्डीकवच एक अमोघ स्तोत्र आहे. रणांगणावर जाण्यापूर्वी योध्दे चिलखत म्हणजेच कवच परीधान करायचे तसेच सूक्ष्म जगताकडून होणाऱ्या प्रहार प्रतिकारासाठी मंत्रयुक्त चिलखत म्हणजे ''कवच'' स्तोत्र होय! साधकांनी दुसऱ्यांच्या ईर्ष्येपासून, मत्सरापासून, द्वेषापासून, स्वसंरक्षणासाठी, सूक्ष्म, अदृश्य जगतातून होणाऱ्या आक्रमणापासून रक्षण करण्यासाठी काही बाधीत ठिकाणे, काही वेळा स्वत:च्या मनातील तीव्र नकारात्मक भावना, चिंता आदिपासून स्वत:चे संरक्षण करण्यासाठी कवच पाठ करणे महत्वाचे! असे आक्रमण झाले तर तुम्हाला तुमच्या कुटुंबीयांना शरीर, मानस व्याधी निर्माण होतात, मुले सारखी परीक्षेत नापास होतात, नोकरी लागत नाही, लागली तर टिकत नाही, नाना खर्च अचानक होतात, समाजात मानहानी, सतत चिंता त्यातून निराशा, मनामध्ये विकल्प येतो, संयम सुटू लागतो, ईष्ट देवतेविषयी अश्रध्दा, गैरसमज वाढू लागतात. याने साधकाची निष्ठा, श्रद्धा डळमळीत होवू लागते. त्यातून जर तो साधनेपासून दूर गेला तर दुर्गती ठरलेली! यासाठी साधकाने प्रात: सायं कवचाचा पाठ करावा.

अनेक देवतांची कवचे उपलब्ध आहेत. उदा. रामरक्षा, हनुमान बाहुक, दत्तकवच, नारायण कवच, शिवकवच वगैरे. यामध्ये चण्डीकवच सर्वोत्तम आहे असे स्वामीजींचे मत आहे. स्वामीजींनी त्यांचे अनेक मंत्रानुभव सविस्तर दिले आहेत ते जिज्ञासूंनी मूळातून वाचावेत.

या पुस्तकाचे सर्वात महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे या चण्डीकवचातील श्लोकांपासून विविध अवयवांचे अधिष्ठात्री देवतांचे मंत्र बनवून त्याचा चक्क तक्ताच छापून साधकांवर कृपाप्रसादच दिला आहे. हे सर्व मंत्र अमोघ सामर्थ्य राखतात. त्यांचे प्रयोग कसे करावेत याचे सविस्तर मार्गदर्शन स्वामीजींनी केले आहे.

स्वामीजींच्या मते प्रार्थना जी विकल्परहीत श्रद्धेने, तन्मयतेने, कळकळीने केली जाते ती त्रितापहारिणी ठरते. त्रितापाचे स्वामीजी स्पष्टीकरण करतांना रामचरित मानसातील दोहा उधृत करतात.

दैहिक दैविक भौतिक तापा रामराज्य नही कछु व्यापा।

जिथे रामराज्य आहे तेथे दैहिक, दैविक, भौतिक दु:खे राहात नाहीत. यांनाच भगवतगीतेमध्ये, ज्ञानेश्वरीमध्ये आधिदैविक, आधिभौतिक आध्यात्मिक असे म्हणले आहे. रामरायाचे हे राज्य उत्तर प्रदेशातील अयोध्येत नसून आपल्या हृदयात आहे.

स्तोत्र व मंत्र यांना पायाभूत असणारी कंपने व तरंग हे प्रार्थनेमध्ये नसतात. प्रार्थनेमध्ये अक्षरे, शब्दरचना, वृत्तरचना महत्वाचे नसून भाव महत्वाचे असतात. स्वामीजींचे मते ज्या क्षणी भावना निर्मळ झऱ्यासारख्या खळखळ वाहू लागतील त्या क्षणी ती व्यक्ती ईश्वर सानिध्याचा समीपतेचा आंतरिक अनुभव घेते. प्रार्थना ही मौनातूनही करता येते. ध्यान म्हणजे काय? तर नि:शब्द प्रभू प्रार्थना! प्रभू सान्निध्याची अनुभूती!

स्वामीजींचा भारतीय दर्शनशास्त्राचा, गुरूचरित्र, देवी सप्तशती, ज्ञानेश्वरी, भगवद्‌गीता, ज्योतिषशास्त्राचा, फिजिक्स, केमिस्ट्री, गणित, काव्यशास्त्र, इंग्रजी, मराठी आदि विषयांचा अतिशय गाढा अभ्यास आहे. या पुस्तकामध्ये ठायी ठायी संशोधकाची वृत्ती दिसते. जसे पी.एच.डी. शोध प्रबंधात प्रत्येक बाबीसाठी संदर्भ द्यावा लागतो तसे अनेक वैद्यक संदर्भ आढळतात.

मी एकदा स्वामीजींना एक धाडसी प्रश्न विचारला होता की तुम्ही नेहमी रिसर्च पेपर्स वाचत असता का? कारण नाना संदर्भाचे दाखले आपण सतत देत असतात. मी कधी तुम्हाला लॅपटॉप घेवून नेट सर्फींग करतांना बघितले नाही. स्वामीजी हसत हसत म्हणाले, ***''प्रभू मै बीना तेरी हाथ की''*** यामधून माझ्या बालबुद्धीला सुचलेले उत्तर म्हणजे साधनेतून निर्माण झालेली ऋतंभरा प्रज्ञा! ही जागृत झाल्यावर सर्व ज्ञान हे करतल आमलकवत जाणवू लागते.

स्वामीजींनी एक संदर्भ दिला आहे, एका विश्वविख्यात हृदयरोगतज्ज्ञ डॉ. झारीन हार्नेयांचा! त्यांनी असंख्य हृदयविकाराच्या रूग्णांचा अभ्यास केल्यानंतर त्यांचे हे लक्षात आले की, हृदयरोगाचा नकारात्मक भावभावनांचा विलक्षण संबंध आहे. अगदी हीच बाब चरक संहितेत हृदयरोग चिकित्सेत आली आहे. **परीहार्या विशेषण मनसो दु:ख हे तव: ।** आजच्या गतीमान युगात हृदयरोगाने पीडीतांमध्ये वृध्दापेक्षा तरूण दिसत आहेत ही बाब लक्षात घेण्यासारखी आहे.

प्रार्थना म्हणजे ईश्वर शरणागती बद्दलचा सर्वोत्तम रस्ता जो आपणास विश्वास देतो की तो आहे! प्रार्थनेने केवळ स्वत:चेच नाही हजारो किलोमीटर दूर असणारे व्यक्तीचे शरीर मानस व्याधींपासून मुक्तता होते, प्रार्थनेने चक्क पाऊसही पडल्याची अनेक उदाहरणे आहेत. गुन्हेगार व्यक्तीचे मनातील पापी विचार नाहिसे होतात. इथे मला मोह होत आहे एक संदर्भ उधृत करायचा महर्षी महेश योगींनी १९९३ मध्ये अमेरिकेत वॉशिंग्टन डीसी मध्ये ४००० शास्त्रज्ञांकडून २ महिने भावातीत ध्यान करवून घेतले. याचा परिणाम त्या प्रयोगात भाग घेतलेल्यांना शरीर मानस फायदे झाले. एवढेच नव्हे तर वॉशिंग्टन डीसी मधील आत्महत्या, बलात्कार, खूनांचे प्रमाण ४८ टक्के कमी झालेले आढळले. किती विलक्षण आहे! याचा अर्थ आपण वैयक्तिक व समूहाने स्वत:करता, कुटुंबाकरता, समाजाकरता, देशाकरता, विश्वशांतीकरता कळकळीने प्रार्थना करणे अतिशय गरजेचे आहे.

स्वामीजींच्या मते व्याधी, विष, आजार, प्रतिकूल परिस्थिती, टीका, नकार यांचा प्रतिकार करण्याची शक्ती मनात आहे. मनावर ईष्ट देवता, श्रध्देचा प्रचंड परिणाम होतो. स्तोत्रमंत्रांचे तरंगाचा भौतिक परिणाम, ईश्वरीकृपेचा दैवी परिणाम या तीन गोष्टींचा मंत्र व स्तोत्र पठण करणारी व्यक्ती किती व कसा लाभ घेवू शकते यावर रोगमुक्ती अवलंबून असते.

सन्तु निरामया:

प्रकाशपर्व प्रकाशनाने या विशेष भागाचे सहभाग केल्याने पुस्तकाचे महत्व शतपटीने वाढले आहे. स्वामीजींनी जे शीर्षक योजिले आहे ते अतिशय समर्पक आहे, यातून जनसामान्यांच्या विषयी त्यांची कळकळ स्पष्ट होते.

या विभागामध्ये भारतभरातील साधक वैद्यांमधील काही वैद्य व साधकांना आलेले अनुभव त्यांचेच शब्दात दिले आहेत. यात अग्रणी आहेत बहुभाषा कोविद आयुर्वेदात एम.डी. पी.एच.डी असणारे प्रा. वैद्य गौरंग लाइन्सवाला व स्वयं लेखक. याशिवाय साधक परिवारातील रावेर येथील सौ. प्रतिभा कुलकर्णी, श्री. गोपाल सिसोदिया, श्रीमती परीमल भारतीय, राजाधीराज हेमेंद्र प्रतापसिंह बनेडा, राजस्थान.

विष्णू सहस्त्रनाम व हरीपाठावर संशोधन करून कोणत्या नक्षत्रास ते उपयुक्त ठरतील असा तक्ता देणारे अहमदनगरचे श्री. मंगेश साठे यांचे सर्वांचे अनुभव समाविष्ट आहेत.

हृदयविकार, कॅन्सर, तीव्र ज्वर, नैराश्य आणि अनेक अवघड वैद्यकीय अवस्थांमध्ये स्तोत्र मंत्र कसे उपयोगी पडले याविषयी स्वामीजींनीच स्वत: सविस्तर लिहिले आहे. जे असंख्य पीडीतांना एक व्याधीमुक्तीचे सूत्रच ठरणार आहे. हे पुस्तक पिढ्यान पिढ्यांसाठी एक खजिना ठरणार आहे यात तिळमात्र शंका नाही. भारतामध्ये व भारताबाहेर अनेक भाषांमध्ये भाषांतराची गरज आहे.

स्तोत्र मंत्राचे विज्ञान व सन्तु निरामय: या पुस्तकाचे मुखपृष्ठसुद्धा अतिशय काव्यकतेने बनवले आहे. नाना मंत्रांची पार्श्वभूमी घेवून मधोमध सोनेरी सूर्य प्रतिमेत आरक्त वर्णीय ओंकार! त्या प्रकाशाची आभा चहूकडे फाकते आहे. खाली एक इ.सी.जी. ची रेखा दाखवून त्यामध्ये ॐ नम: शिवाय लिहून एक गूढ संदेश देवून टाकलेला आहे.

स्मरणिकेसंदर्भातील काही वेचक प्रतिक्रिया

जय गजानन माऊली...आपण पाठवलेली स्मरणिका मिळाली..... आपल्याला अनेको प्रणाम माऊली... स्मरणिका खूपच सुंदर, चिंतनीय आहे विशेषतः सरू ताईंचे ‘सदा सर्वदा योग तुझा घडावा’ खूपच आवडले. अजून पूर्ण वाचून झालेले नाही. प्रणाम माऊली.

– मंदा पाटील, मुंबई

५. ।। वैद्य भेटला सुखदाता ।।

– ज्ञानेश्वर विठ्ठल राजकुंटवार, पुणे

वेगवेगळ्या कारणाने अनेक स्मरणिका प्रकाशित होतात. काही सोपस्कार म्हणून तर काही प्रसिद्धीसाठी. पण '**सविता अर्घ्य**' ही स्मरणिका सर्वार्थानेच अनुपम आहे. या स्मरणिकेचा मुळात विषय आहे तो एका प्रसिध्दीपराङमुख अद्वितीय विभूतीच्या अमृतमहोत्सवाचा. जे जे त्यांच्या संपर्कात आले त्यांना या अवलिया विषयी कितीही माहिती मिळाली तरी ती कमीच वाटते. नदीचे मूळ व ऋषीचे कूळ शोधू नये असे म्हणतात. पण जिज्ञासा शांत बसू देत नाही. काही वर्षांपूर्वी जेंव्हा अचानक स्वामीजींच्या दर्शनाचा योग आला तेंव्हापासूनच उत्सुकता होती की हे व्यक्तीमत्व मूळात कसे असेल. 'सविता अर्घ्य' मुळे ही जिज्ञासा अल्पांशाने का होईना पूर्ण झाली. 'पवित्र ते कुळ पावन तो देश' हा श्री. नंदकिशोर बाविस्करांचा लेख वाचतांना सर्वच माहिती माझ्यासाठी नवीन होती. सरूताईंनी 'सदा सर्वदा योग तुझा घडावा' या लेखमालीकेतून पूज्य स्वामीजींच्या व्यक्तीमत्वाचे किती तरी पैलू उलगडून दाखविले ज्यांची मला कल्पनाही नव्हती. स्वामीजींना सरूताईंनी केवळ जवळूनच पाहील नाही तर अनुभवलही आहे हे पदोपदी जाणवते म्हणूनच त्या इतक्या मनस्वी शब्दांतून कथन करू शकतात. *'संन्यासाशी नाते गोते। नसे काही।।'* हे खरे असले तरी एखाद्या कुटुंबवत्सल व्यक्तीप्रमाणे सर्वांची अगदी आस्थेने, आपुलकीने चौकशी करण्याची स्वामीजींची वागणूक अगदी हृदयस्पर्शी आहे हे स्मरणिकेतील अनेक लेखातून प्रकर्षाने जाणवते. या स्मरणिकेचे अजून एक जाणवणारे वैशिष्ट्य म्हणजे यातला प्रत्येक लेख, प्रत्येक वाक्य किंबहुना प्रत्येक शब्द हा लिहीणाऱ्याच्या अंत:करणातून उमटलेला हुंकार आहे. अगदी अकृत्रिम, प्रांजळ आणि उस्फूर्त. म्हणूनच ही स्मरणिका खऱ्या अर्थाने स्मृतीग्रंथ झाला आहे, अगदी संग्रही ठेवण्या योग्य.

लहान–थोर, गरीब–श्रीमंत, स्त्री–पुरूष असा कसलाच भेदाभेद न पाळणारा, कुठलीही संस्था–मठ किंवा शिष्य परंपरा नसणारा, प्रसिद्धीच्या प्रकाश झोतापासून हेतु:पुरस्सर दूर रहाणारा अवलिया या काळात तरी अकल्पनीय आहे. अमानित्वाचे असे अनोखे उदाहरण क्वचितच पाहायला मिळेल. ***'गुरू न पाहती योग्यता। न मोजती कुणाची क्षमता। सर्वांवरी कृपामृता। वर्षविती।।'*** हे जणू त्यांनी स्वत:साठीच लिहीलं असाव. अहंभाव विरून सोहंभावाचा उदय होणे व अंती सोहंभावाचाही अस्त होऊन सामरस्यभावाची दिव्यानुभुती येणे ज्यांच्या अनुसंधानाने घडते ते सद्‌गुरू अशी सद्‌गुरुंची व्याख्या केली तर स्वामीजी याचे मूर्तीमंत उदाहरण होय. त्यांच्या व्याख्यानातून किंवा ग्रंथ संपदेतून ते केवळ तार्किक प्रतिपादन न करता आपल्याला भावलेली दिव्यत्वाची प्रचिती ते रसिकतेने शब्दांकित करतात. त्यांचा प्रत्येक ग्रंथ हा सर्वांसाठी एखाद्या वैद्यासारखा उपयुक्त ठरला आहे. या ग्रंथ संपदेचे पुन: पुन्हा वाचन, मनन, चिंतन होणे आवश्यक आहे. अशा सद्‌गुरू वैद्याबद्दल समर्थांनी म्हटले आहे ***वैद्य भेटला सुखदाता, रोग पालटला आता । रस ओतीला कानात, येऊनी झोंबला नयनात । रस भिनला हाडासांधी, देहा पालटली बुद्धी । दिव्य देही ओतीला रस, गुरू न्याहाळी रामदास ।।*** पू. स्वामीजी अशा वैद्याचे मूर्तीमंत उदाहरण आहेत.

४) सविता

१. नक्षत्रांचे देणे

– एक ज्योतिष अभ्यासक

स्वामी श्री सवितानंदांच्या जीवनाचे ज्योतिषिय विवेचन
जन्मतारीख - ०३/०७/१९४६. वेळ - सकाळी ११.३०, वार-बुधवार
जन्मरास-सिंह, नक्षत्र-मघा चरण योग-सिध्दीयोग, करण-बालव. लग्नरास कन्या

राशीस्वामी सुर्य– ग्रहांचा राजा कर्मस्थानामध्ये षडबलामध्ये सर्वोत्तम, प्रखर तेज देणारा आहे. कर्मस्थानातील सुर्य उच्चशिक्षण, कुशाग्रबुध्दी, सामाजिक उच्चस्थान व अधिकारप्राप्ती देणारा आहे. सविता म्हणजे सूर्य. त्यामुळे त्यांच्या गुरूंनी त्यांना सवितानंद हे नाव बहाल केले. परंतू मातृ सुखात कमतरता राहते. वयाच्या १९ व्या वर्षी घरामध्ये दु:खद घटना घडवितो. तसेच चंद्रराशी सिंह १२ व्या स्थानी असल्यामुळे मुळातच ही पत्रिका मोक्ष देणारी आहे. त्यामध्ये चंद्र मंगळ अंशात्मक युती असल्याने हा अष्टलक्ष्मीयोग प्राप्त झालेला आहे.परंतु हा योग कुटुंबासाठी नसून आश्रम, हॉस्पिटल, शिक्षण संस्था व ट्रस्ट यासाठी फलदायी आहे.

लग्नराशी स्वामी – बुध हा कर्मस्थानाचा अधिपति असून जन्मवाराचा स्वामी आहे. तो शनी, बुध, प्लूटो या मित्रांसोबत लाभस्थानी आहे. तो सर्व इच्छा पूर्ण करणारा आहे. तसेच सर्व स्तरातील मित्रांचा बहुमुल्य संग्रह देणारा आहे. लग्नस्थानातील बुध हा व्यक्तीला संपन्नता, बुध्दीवान, सुखी, नोकरचाकरयुक्त, दीर्घायु, सौम्यस्वभावी, विवेकी, ज्ञानी, भाग्यवंत व लोकप्रिय करतो. त्यामुळे स्वामीजी हे बहू आयामी व्यक्तीमत्व संपन्न आहेत. त्यांना सर्वच क्षेत्रातील उत्तम जाण आहे. बुध हा लिखाण, प्रकाशन, कॉमप्युटर इत्यादी गोष्टीमध्ये सर्वोत्तम यश देतो.

मघा नक्षत्र – हे केतूचे नक्षत्र आहे. केतू म्हणजे पताका (झेंडा) अशा व्यक्ती पुर्वजन्मीच्या योगी असतात. त्यांचे अपूर्ण कार्य पुर्ण करण्यासाठी जन्माला येतात. कोणत्याही गोष्टीमध्ये तपशीलात मुळापर्यंत जाण्याची मानसिकता असते. त्यामुळे कामाचा उरक कमी होतो. बरीच कामे अपुरी राहण्याची शक्यता असते.

सिद्धी योग – या नावामध्येच या योगाचा महिमा आहे. या योगावर सिद्ध पुरुषच जन्माला आले आहेत. त्यांना सर्व सिद्धी प्राप्त असून सर्व इच्छा सिद्ध करण्याचा ईश्वरी आशीर्वाद आहे.

बालव करण – हे चर चरण आहे. त्यामुळे स्वामीजींच्या आयुष्यामध्ये स्थिरता नाही. सतत चालत राहणे हेच जीवन.

अशा प्रकारे पंचांगातील पाच अंग - वार, राशी, नक्षत्र, योग करण यांच्या विवेचनावरून अशा मुहुर्तावर जन्माला आल्यामुळे स्वामीजी हे निश्चितच महान योगसंपन्न व सिद्धपुरुष आहेत.

ग्रहमानानुसार जीवन प्रवास –

जन्मत: केतूचे मघा नक्षत्र १७/०२/१९४७ पर्यंत होते. आईला शारिरिक त्रास सहन करावा लागला. २१/०८/१९५३ पर्यंत जन्मत: साडेसाती. नंतर १९४७ ते १९६७ या वीस वर्षामध्ये वडिलांची प्रगती व भरभराट झाली. शिक्षणामध्ये उत्तम यश मिळाले. शुक्र, बुध व शनि युती असल्यामुळे शनीने कष्टाने शिक्षण पुर्ण करण्यास भाग पाडले. त्यामुळे १९६३ ते १९६७ या कालात सर्वस्तरावर त्रास भोगावा लागला. परंतू शुक्र भाग्यकारक असल्यामुळे थोर विभुतींचे अनुग्रह व आदेश झाले. शनीमुळे परिपक्कता आली, अकाली वैराग्य आले. बुधामुळे एकपाठी बुद्धीमत्ता मिळाल्यामूळे अनेक प्रकारची वांङ्मयाचा अभ्यास घडला. वाणीवर प्रभुत्व प्राप्त झाले व उच्चपदवी प्राप्त झाली.

१९६७ ते १९७३ सहा वर्ष सुर्य महादशेत शिक्षण क्षेत्रात चमकणारी ठरली परतु व्ययाचा स्वामी असल्यामुळे खर्च, हॉस्पिटल यांना सामोरे जावे लागले. झोपेचे गणित बिघडले. व्यय स्थानाचा स्वामी हा व्यक्तीला फकीर करतो. निस्वार्थी व दानी बनवितो. जगण्याची इच्छा संपेल अशा घटना घडवितो. पण सूर्य दिग्बली असल्याने प्रचंड आत्मविश्वास व सचोटीच्या जोरावर स्वामीजी कार्यरत राहिले. या काळात समाजातील लोकांचा अनुभव गाठीशी आला.

१७/०२/१९७२ ते १७/०२/१९७३ शुक्र अंर्तदशेमुळे विवाह योग जूळून आला. विवाहाचा स्वामी गुरु प्रथम स्थानी. या अत्यंत शुभ योगामुळे अतिशय चारित्र्य संपन्न व दैवीगुणांनी युक्त अशी सहचारिणी लाभली व स्वामीजींची आध्यात्मिक यात्रा सुरू झाली. प्रथम स्थानातील गुरू हा व्यक्तीला जगन्मान्य गुरू बनविता. तसेच स्वामीजींना जे गुरूपद प्राप्त झाले आहे. त्यात त्यांच्या पत्नीचा बहूमुल्य वाटा आहे. तसेच त्यांच्या व स्वामीजींच्या आईच्या पुण्याईमुळे स्वामीजींना आध्यात्मिक उंची लाभली आहे.

१९७३ ते १९९० हा चंद्र व मंगळाचा कालावधी. जन्मतःचा चंद्र लाभेश परंतु १२ व्या स्थानी मंगळाबरोबर आहे. त्यात मंगळ हा अष्टमाचा स्वामी असल्यामुळे उपजत अतिंद्रिय शक्ती प्राप्त झाली. देहातीत सिद्ध आत्म्यांचा अनुग्रह, मार्गदर्शन, पुर्वजन्माची संपूर्ण जाणकारी प्राप्त झाली पण संसार कसाबसा झाला. दोन अपत्ये झाली. परंतु १२ वे स्थान हे फकिरवृत्ती देते. मोक्षाची ओढ राहते. प्रपंचात मन रमत नाही. मंगळामुळे ध्यान धारणा एकांत वासाची ओढ राहिली व यश देखील मिळाले.

१८/०१/१९७६ ते १९/०५/१९७७ गुरु अंर्तदशा. गुरूच्या शोधात बाहेर पडले. गिरनार येथे प्रत्यक्ष दत्तमहाराजांचा सहवास लाभला.

१८/१२/१९७८ ते १९/०५/१९८० बुध अंर्तदशा. या काळात बह्मचर्याची दिक्षा प्राप्त झाली.

१८/१२/१९८० ते १८/१२/१९८२ शुक्र अंर्तदशा. भाग्यकारक असल्यामुळे संन्यास दिक्षा प्राप्त झाली. परंतु शनिमुळे त्यांना अनेक विरोधांना व संकटांना सामोरे जावे लागले. अज्ञातवासात राहावे लागले.

१६/०७/१९८३ ते ०३/०८/१९८४ राहू अंर्तदशा. राहू भाग्य स्थानामध्ये आहे. त्यामुळे भाग्योदयाचा

पुढचा टप्पा सुरू झाला. परंतु तो असूरी ग्रह असल्यामूळे त्यांना टोकाची म्हणजे अवधूत दिक्षा मिळाली. अंगावरची असलेली भगवी वस्त्रे देखील त्याग करावी लागली. लाकडाच्या पात्रात जेवून दिगंबर अवस्थेत भिक्षुक बनले. येथे सर्व भव बंधनातून गुरुंनी त्यांना मुक्त केले.

०३/०८/१९८४ ते १०/०७/१९८५ गुरू अंर्तदशा. तेथे ते स्वत: सर्व बंधनातून मुक्त होऊन गुरूपदावर आरूढ झाले.

२२/०१/१९८८ ते ०१/०३/१९८९ शुक्र अंर्तदशा. आध्यात्मिक कार्यास सुरूवात झाली. हॉस्पिटल उभारणी व ट्रस्टचे निर्माण झाले.

१७/०२/१९९० ते १७/०२/२००८ राहू काळ १८ वर्ष. वय वर्ष ४३ ते ६१ भाग्यकारक.

३०/१०/१९९२ ते २६/०३/१९९५ आश्रमाची स्थापना झाली. अनेक प्रकारची दगदग सहन करावी लागली.

१७/०२/२००८ ते १७/०२/२०२४ गुरू महादशा. आयुष्यातील सर्वात उत्तम काळ. आज पावेतो केलेल्या कामाची फलश्रुती झाली. गुरू म्हणून समाजासाठी त्याग/ काम करण्याची जी ओढ आहे त्यामध्ये उत्तम यश मिळाले. उत्तम लिखाण झाले. त्याबरोबर अनेक ग्रंथांचे, पुस्तकांचे प्रकाशन झाले. अधिकृत गुरू म्हणून उत्तम वाटचाल सुरू आहे.

१७/०२/२०२४ ते १७/०२/२०४३ शनि कालखंड – वय वर्ष ७७ ते ९६

स्वामीजींना जन्मत: साडेसाती आहे. थोडक्यात स्वामीजी शनी प्रधान आहेत. अध्यात्मामध्ये वैराग्य व संयम शनी देतो. हा शनी व्यक्तीला ९० वर्षापेक्षा जास्त आयुष्य देतो. तो कमीत कमी ४ साडेसाती भोगायला लावतो. दर ३० वर्षानी साडेसाती येते. त्यामुळे अशा व्यक्तीला वय वर्ष ९० ते १२० दरम्यानचे आयुष्य लाभते.

०२/११/२०१४ ते २६/१०/२०१७ ही तिसरी साडेसाती संपलेली आहे. हा शनी स्वामीजींना दीर्घायुषी व दीर्घोद्योगी करणारा आहे. या काळात लिखाण बंद होईल. राहत्या जागेत बदल होतील. आयुर्वेदामध्ये महानकार्य घडेल. औषधी वनस्पतीचे उत्पादन व प्रकिया उद्योग होईल. तसेच आयुर्वेद महाविद्यालयाची संकल्पना राहील. गोशाळा निर्माण होईल. मोठया प्रमाणावर शेत व डोंगर जमिन खरेदी होईल. पतंजलि संस्थेप्रमाणे स्वामी कार्य विस्तारेल. या कार्यात स्वामीजींचा (पूर्वाश्रमीचा मुलगा) सहाय्यक राहील. शासकीय सहाय्य सर्वोतपरी मिळेल. आरोग्याच्या दृष्टीने डाव्या पायाचा त्रास राहिल. बाकी कोणतीही तक्रार राहणार नाही.

२१/०८/२०३६ ते ३०/०९/२०३७ आरोग्याची काळजी घेणे.

०७/०८/२०३७ ते ३०/०९/२०३७ गंडांतर योग आहे. शस्त्रक्रियेस सामोरे जावे लागेल.

१७/०२/२०४३ ते १७/०२/२०६० बुध महादशा. वय वर्ष ९६ ते ११३ शनि मधील गंडांतर टळल्यास वरिल काळ अतिशय सुखदायी राहिल. कारण तो राशी स्वामी आहे. सर्व इच्छा पूर्ण करणारा आहे.

१९/०८/२०५१ ते १५/०८/२०५२ हे शेवटचे गंडांतर वयाच्या १०६ व्या वर्षी येईल.

स्वामीजींच्या पत्रिकेमध्ये ज्योतिष शास्त्राच्या दृष्टीने खास असणारी तीन वैशिष्ट्ये आहेत.

१) जन्मतः साडेसाती तर आहेच पण राहू-केतू सोडले तर बाकीचे सर्व ग्रह शनीच्या अधिपत्या खाली आहेत. शनी अकराव्या स्थानी आहे म्हणून लग्न घरातील गुरुवर तिसरी पुर्ण दृष्टी आहे. बाराव्या घरात मंगळ-चंद्र, अकराव्या घरात स्वतः शनी बरोबरच बुध आणि शुक्र, दहाव्या घरात सूर्य, दहा-अकरा-बारा तिन्ही घर शनीच्या आधीन.

२) अकराव्या स्थानात शने-शुक्र-बुध आहेत आणि त्यामुळे एक विलक्षण असा महापरिपूर्ण योग : महापुरुष योग सर्वार्थाने घडला कारण हे तीनही ग्रह मूल त्रिकोणाचे स्वामी आहेत. लग्न कन्या रास, स्वामी बुध, पंचमात मकर राशी स्वामी शनी, नवमात वृषभ राशी स्वामी शुक्र म्हणजे लग्न:पंचम:नवम या मूल त्रिकोणाचे स्वामी लाभस्थानी-परीपूर्ण महापुरुष योग

३) अष्टम स्थानाचा स्वामी मंगळ: मृत्यु स्थानी: मोक्ष स्थानी मनाचा कारक चंद्राबरोबर आणि अष्टमाचे अष्टम म्हणजे तृतीय स्थानी मोक्षकारक केतु मंगळाच्याच राशीत. हा सर्व योग माँ भगवतीच्या कृपेने इच्छामृत्युची सिद्धीदाता

अशा प्रकारे स्वामी श्री सवितानंदजी या सिद्धपुरूषाच्या जीवनामध्ये ग्रहांनी केलेले आदेशानुसार फल प्राप्ती झालेली आहे.

यज्ञानाम् जप यज्ञोस्मि या श्री. उदय फडके यांच्या लेखातील श्री. रामभाऊ बेटावदकरांना हात दाखवल्याचा प्रसंग येथे देत आहोत. मूळ वर्णन स्वामीजींच्याच शब्दात. ''त्यानंतर त्यांनी पुन्हा आमचा हात हातात घेऊन एक विशिष्ट रेखा दाखवत म्हणाले, ''ही रेखा लाखो व्यक्तीत एखाद्याच्याच हातावर असते आणि विशेष म्हणजे ती तुमच्या दोन्ही हातांवर आहे. या लाखोंची लोकसंख्या असलेल्या मुंबईत अशी रेखा असणारा एक तरी हात सापडेल की नाही हीच शंका.

येथेच आम्ही याविषयी आणखीन एक सांगतो त्यानंतर कमीत कमी तीन-चार हस्तरेखा तज्ञांनी आमचे हात पाहिले. तेही त्या रेखेविषयी कांही सांगू शकले नाही, पण त्यांनी सर्वांनी नुसते हात पाहून वंदन केले. एकदा तर राजस्थानचा एक उर्मट, उद्धट, अहंकारी ज्योतिषी त्याचा जन्मपत्रिका, हस्तरेखांचा खूप चांगला अभ्यास होता. त्याने सुरूवातीला आमच्याशी अगदी मर्यादा सोडून, पायरी सोडून, उपमर्द करीत व्यवहार केला, वागणे, बोलणे केले. आम्ही त्यावेळी चातुर्मासासाठी ज्या मंदिरात थांबलो होतो त्या मंदीराच्या पुजाऱ्याला त्याचे वागणे आवडले नाही. पुजाऱ्याच्या नाराजीवर तो ज्योतिषी म्हणाला, ''मी अनेक ठिकाणी फिरत असतो, जात असतो, अनेक तीर्थस्थानात असे हजारो साधु संन्यासी पाहिले आहेत. ते त्याच्यावर रागावले, नाराजीच्या सुरात कांही बोलायला सुरूवात केली. आम्ही त्यांना इशारा करून गप्प केले. म्हणालो, आम्हाला कांही फरक पडत नाही तुम्ही का चिडता?'' दुसऱ्या दिवशी त्या ज्योतिष महाशयांनी आम्हाला विचारले, ''तुमची पत्रिका आहे?''

आम्ही म्हणालो, ''आम्ही कशाला बरोबर पत्रिका घेऊन फिरूं? पण तोंडी सांगू शकतो.'' त्यानंतर त्याला पत्रिका सांगितली तसेच त्याला स्वत:लाच पत्रिका करायची असेल म्हणून आवश्यक ती सर्व माहिती सांगितली. त्यांनी पत्रिका पाहिली मग म्हणाले, ''हात पण दाखवा. हाताच्या रेखा पाहिल्या. एकदा पत्रिकेकडे एकदा हस्तरेखांकडे पाहात दोन चार वेळा असे केले आणि अचानक उठले, साष्टांग दंडवत घालीत म्हणाले, ''माझ्या अपराधांची क्षमा करा, काल मी तुमच्याशी उद्धटपणे, उर्मटपणे वागलो. क्षमा असावी. त्रिवार क्षमा मागितली.''

असाच अजून एक विलक्षण प्रसंग. संन्यासोत्तर अज्ञातवासाच्या काळात स्वामीजी रेल्वेने प्रवास करीत होते. उत्तर प्रदेश मधून महाराष्ट्रात येणाऱ्या साधारण वर्गाच्या (general class) डब्यात दाटीवाटीने स्वामीजी बसले असताना त्यांच्या समोरील बाकड्यावर एक व्यक्ती बसली होती. सहाजीकच तृतीय श्रेणीचा डबा असल्याने स्वामीजींच्या वेषावरून त्यांच्याबद्दलच्या आदरपूर्वक औत्सुक्यातून इतर प्रवासी विचारपूस करताना ही व्यक्ती मात्र अंतर्मुख होऊन शांतच बसली होती. थोड्यावेळाने पुढील स्टेशनवर स्वामीजींच्या अधिक जवळची सीट मोकळी झाल्यानंतर ती व्यक्ती अजून जवळ आली. पुढे अजून काही वेळाने खिडकीतील मोकळी ऐसपैस जागा सोडून ती व्यक्ती स्वामीजींच्या अगदी लगतच्या सीटवर येऊन बसली. स्वामीजींच्या चाणाक्ष नजरेतून हे अर्थातचच सुटले नव्हते. गाडी स्टेशनवरून निघाल्यावर डब्यात थोडी समासूम (गोंधळ कमी) झाल्यावर ती व्यक्ती अचानक स्वामीजींना म्हाणाली, क्या आप मुझे आपका हाथ दिखायेंगे? स्वामीजींचा हात पाहिल्यानंतर ती व्यक्ती उठून उभी राहिली व स्वामीजींना चरण स्पर्श करुन म्हणाली, काशी व आसपासच्या पंचक्रोशीत गेल्या कित्येक पिढ्यांपासून आमच्या घराण्याचा हस्तरेखा तज्ञ म्हणून नावलौकिक आहे. मी कोर्ट कचेरीच्या कामाकरीता निघालो आहे त्यामूळे आज सकाळ पासूनच माझी मनस्थिती उद्विग्न झाली होती. रेल्वेमध्ये आपणास पाहिल्यानंतर माझे मन काहीसे शांत झाल्याचे माझ्या लक्षात आले. मी आणखीन थोडा जवळ येऊन बसल्यावर मनाला जास्तच शांती मिळाली. आपणा शेजारी बसल्यावर मानाची उद्विनता जाऊन कोर्टाचा जो काही निर्णय होईल तो स्वीकरण्याची मानसिकता तयार झाली. केवळ आपल्या दर्शनाने माझ्या मानसिक अवस्थेत सुधारणा झाल्याने आपण निश्चितच आध्यात्मिक क्षेत्रातील कोणी अधिकारी पुरुष असणार हे माझ्या लक्षात आल्याने आपणास हात पहाण्याची विनंती केली.या हस्तरेखा तज्ञाने स्वामीजींना आलेले विशिष्ट आध्यात्मिक अनुभव, त्यांना प्राप्त झालेल्या विविध सिद्धी यांचे वर्णन केले आणि विशेष करुन हे देखील सांगितले कि आपल्या हातावर एक अशी रेखा आहे जी आपल्याला इच्छामृत्येचे वरदान प्राप्त असल्याचे दर्शवते.

***

2. Biofield: Introduction, Methods and Spirituality

- Prof. Dr. Avishkar Katti, Pune

1. Electromagnetic Field as a prerequisite to understanding Biofield

Let us first start with an understanding of the four basic forces in nature. These are the gravitational force, electromagnetic force, strong force and the weak force. The force of gravity, we all experience in day to day life. The electromagnetic force is also one which we experience daily but in a more subtle way. The origin of the electromagnetic force can be traced to the fundamental sub atomic particles, that is the protons and electrons. The force field created by the protons or electrons is defined as the electric field. The magnetic field is a derivative of this electric field under certain conditions.

Now let us do an interesting thought experiment. Imagine a person punching you in the face. Why does that hurt? Because the person's fist hit you and connected with your face. But let us go a little bit more into depth of what exactly happens here. Cells are the basic constituents of our body. These cells are made up of atoms. An atom is a centralized region of extreme density and positive charge (the nucleus), surrounded by a region. We can loosely say that an atom is basically a 'fuzzy' ball of charges.

The very concept behind contact of two bodies relates to the electric field. Every atom has its own electric field, and when we put two atoms close together, they can interact with the electric field of the other. It can either lead to coexistence with each other- that forms a chemical bond or it can lead to repulsion. The two electron fields repel each other, and the atoms fly apart.So, what we feel is the mutual interaction or repulsion of electrons in the fist and the nose. Nerve sections of our body then generate electrical signals, which are fired along to the brain which interprets this as “pain”. ***Everything that just happened was because of the electric fields of our bodies!***

We're surrounded by our own personal force field, and the insides of our bodies contain electrical generators, which they use to send signals through our body.Virtually every single

